- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३७ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,४१,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# गुंगी गुडियावरून काँग्रेस-राष्ट्रवादीत जुंपली

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला काळे फासले

**वृत्तसंस्था, मुंबई**
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर काँग्रेसने गुंगी गुडिया अशी टीका केल्यामुळे दोन काँग्रेसमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे. या टीकेमुळे संतापलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रदेश प्रवक्ते सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी कुलाबा येथील काँग्रेसच्या गांधी भवन कार्यालयात घुसून जोरदार घोषणाबाजी केली. ठाण्यातही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला काळे फासले. सपकाळ यांनी मात्र टीकेचे समर्थन करताना ही टीका मान्य नसेल तर आपण गुंगी गुडिया नाही हे त्यांनी सिद्ध करावे असे आव्हान दिले आहे.
उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बीड दौऱ्यातील एक व्हीडीओ काँग्रेसने सोशल मीडियावर शेअर केला होता. या व्हीडीओमध्ये पत्रकार परिषदेत उपमख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्रकार प्रश्न विचारत असताना राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे हे पत्रकारांना प्रश्न विचारण्यापासून रोखत असल्याचे दिसत आहे. यावरून सुनेत्रा पवार अजून किती दिवस गुंगी गुडिया बनून राहणार? असा सवाल काँग्रेसने उपस्थित करत त्यांना लक्ष्य केले होते. या पोस्टवर राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र आक्षेप घेत तो महिलांचा अवमान असल्याचा आरोप करत आक्रमक भूमिका घेतली. दरम्यान, मंगळवारी दुपारी २ वाजता गांधी भवनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कार्यालयात घुसले.
यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात घोषणाबाजी करत सुनेत्रा पवार यांची जाहीर माफी मागण्याची मागणी केली. तसेच सपकाळ यांच्याकडे या पोस्टबाबत जाब विचारण्याचाही प्रयत्न केला. यावेळी दोन्ही पक्षांचे समर्थक आमने सामने आल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.



**काँग्रेसची वैचारीक पातळी घसरली : सुरज चव्हाण**
महिलांना कमी लेखण्याची काँग्रेसची वृत्ती आहे का, याचे उत्तर त्यांनी द्यावे, असे आव्हान देत सुनेत्रा पवार यांच्या कामामुळे काँग्रेस अस्वस्थ झाली असून गुंगी गुडियासारखा अपमानास्पद शब्द वापरणे ही काँग्रेसच्या घसरलेल्या वैचारिक पातळीचे द्योतक आहे अशी टीका सुरज चव्हाण यांनी केली. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांची माफी न मागितल्यास राज्यभरात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयात घुसून जाब विचारतील असा इशारा त्यांनी दिला.

**गुंगी गुडिया हा अपशब्द नाही : सपकाळ**
उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर आकसापोटी टिका केलेली नसून गुंगी गुडीया हा शब्द अपशब्द नाही, शिवी नाही किंवा तो असंसदीय शब्द नाही, असा खुलासा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही गुंगी गुडिया असे संबोधले गेले होते, पण त्यांनी त्यांच्या कर्तृत्वातून आपले कणखर नेतृत्व सिद्ध केल्याने अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गा म्हटले. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनीही आपल्या कर्तृत्वातून दुर्गा असल्याचे दाखवून द्यावे, असेही सपकाळ म्हणाले. एक गुंड प्रवृत्तीचा लोकप्रतिनिधी प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराला गप्प बसवतो, अशावेळी उपमुख्यमंत्री एक शब्दही बोलत नाहीत व पत्रकारांचे प्रश्नही घेत नाहीत, अशावेळी हाताची घडी व तोंडावर बोट ठेवले, म्हणून गुंगी गुडिया हा शब्द वापरला आहे, असेही सपकाळ म्हणाले.

**काँग्रेसची संस्कृती बिघडली : देवेंद्र फडणवीस**
काँग्रेस खालच्या स्तरावर उतरली आहे. त्यांना कोणीच विचारत नसल्याने बातम्यांमध्ये येण्यासाठी अशापद्धतीने ते काम करीत आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत इतक्या खालच्या स्तरावर जाणारे हे आपल्याला पहिल्यांदाच पाहायला मिळत आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर टिका केली.

### थोडक्यात

## दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला



**चंदिगड :** पंजाबमध्ये दहशतवादी हल्ला घडवून आणण्याचा मोठा कट पंजाब पोलिसांनी उधळून लावला आहे. पाकिस्तानची गुप्तचर संघटना आयएसआयच्या इशाऱ्यावर काम करत असल्याच्या आरोपाखाली चार अल्पवयीन मुलांसह एकूण नऊ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी या कारवाईत तीन बेकायदेशीर पिस्तूल, ९ जिवंत काडतुसे आणि पेट्रोल बॉम्ब तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पेट्रोलच्या चार बाटल्या जप्त केल्या आहेत. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, हे सर्व संशयित परदेशातील आयएसआयच्या हँड्लर्सच्या संपर्कात होते आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली काम करत होते. या तरुणांना दहशतवादी कारवाया करण्यासाठी प्रशिक्षित केले जात असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तसेच पंजाबमधील सुरक्षा यंत्रणांवर पाळत ठेवणे, बेकायदेशीर शस्त्रे जमा करणे आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडवणे ही जबाबदारी या संशयितांवर सोपवण्यात आली होती.
तपासादरम्यान आरोपींनी सुरक्षा यंत्रणांच्या हालचाली टिपण्यासाठी आणि संवेदनशील ठिकाणांवर नजर ठेवण्यासाठी रेल्वे रुळांच्या बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याची धक्कादायक माहितीही समोर आली आहे. सध्या पोलिस या नेटवर्कमधील अन्य फरार सदस्यांचा शोध घेत असून त्यांच्या परदेशी कनेक्शनची सखोल चौकशी करत आहेत. पुढील तपासादरम्यान आणखी अनेक महत्त्वाची माहिती उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन

**वृत्तसंस्था, मुंबई**
पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने समाजकारण, राजकारणात भरीव योगदान देणारे आणि या क्षेत्रातील अनेक संस्थांचे आधारवड ठरलेले कार्यतपस्वी नेतृत्व काळाने हिरावून नेले आहे अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहार, पश्चिम बंगाल आणि त्रिपुराचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. डॉ. पाटील यांच्या निधनामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाल्याचे फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.
डॉ. पाटील यांनी ज्ञानदेव या आपल्या नावाप्रमाणेच ज्ञानाची आराधना केली. शिक्षण क्षेत्रालाच आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. एका छोट्याशा शाळेपासून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास थक्क करणारा आहे. सुमारे २०० संस्था, विविध प्रकारची आठ विद्यापीठे आणि हजारो विद्यार्थी, असा त्यांच्या कार्याचा विस्तार झाला. विशेषतः वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, आर्किटेक्चर अशा वैविध्यपूर्ण अभ्यासक्रमांची महाविद्यालये आणि आधुनिक सुविधांच्या उभारणीतून त्यांनी आपल्या शैक्षणिक



समुहासोबतच महाराष्ट्राचा नावलौकिक उंचावला, असे सांगत फडणवीस यांनी डॉ. पाटील यांच्या कार्याचा गौरव केला आहे.
डॉ. पाटील यांनी आयुष्यभर शिक्षण, सेवा आणि विनम्रतेची मूल्ये जपली. त्यांनी रुजवलेली शिक्षणसेवेची परंपरा, विनम्रतेचा आदर्श आणि समाजहिताची मूल्ये कायम प्रेरणादायी राहतील. त्यांच्या जाण्याने एका दूरदर्शी शिक्षणमहर्षीचा अंत झाला असला, तरी त्यांचे विचार आणि कार्य पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहतील असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

**दूरदृष्टीचा शिक्षणमहर्षी गमावला : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**
डॉ. डी. वाय. पाटील हे केवळ शिक्षणसंस्था उभारणारे प्रशासक नव्हते. तर समाजपरिवर्तनाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून शिक्षणाला नवे क्षितिज देणारे दूरदृष्टीचे शिक्षणमहर्षी होते, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे. डॉ. पाटील यांनी उभी केलेली शैक्षणिक चळवळ लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी ठरली. आज डी. वाय. पाटील विद्यापीठातून विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून देश-विदेशातील हजारो विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळत आहे. देशभरात सात स्वतंत्र विद्यापीठांची निर्मिती हा त्यांच्या दूरदृष्टीचा आणि कार्यक्षम नेतृत्वाचा ऐतिहासिक ठेवा असल्याचेही शिंदे यांनी म्हटले आहे.

**प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हरपले : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार**
ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या जाण्याने शिक्षण, समाजसेवा आणि सार्वजनिक जीवनाला दिशा देणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हरपल्याची शोकभावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. डॉ. पाटील यांनी शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानून आयुष्यभर कार्य केले. देशभरात शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि अन्य उच्च शिक्षण संस्था उभारून त्यांनी लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याला नवी दिशा दिली. शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि समाजसेवा या क्षेत्रांतील त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि चिरस्मरणीय आहे, असे पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

**दूरदर्शी शिक्षणतज्ज्ञ गमावला : मल्लिकार्जुन खरगे**
पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने एक दूरदर्शी शिक्षणतज्ज्ञ, लोकाभिमुख नेता आणि समाजसेवक गमावला आहे. डॉ. पाटील यांचे संपूर्ण आयुष्य सार्वजनिक सेवेच्या सर्वोच्च मूल्यांचे प्रतीक होते, अशा शब्दात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी डॉ. पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.
तळागाळातील लोकप्रतिनिधी म्हणून सुरू झालेला त्यांचा प्रवास राज्यपाल या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत पोहोचला. हा प्रवास त्यांच्या निष्ठा, नम्रता आणि समाजकल्याणाप्रती असलेल्या अखंड बांधिलकीचा साक्षीदार आहे. आपल्या दीर्घ सार्वजनिक जीवनात ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विचारधारा, परंपरा आणि मूल्यांशी कायम एकनिष्ठ राहिले आहेत. त्यांच्या कार्यामुळे त्यांना राजकीय सीमांच्या पलीकडे जाऊन सर्व स्तरातील लोकांचा आदर आणि स्नेह कायम लाभला, असेही खरगे यांनी म्हटले आहे.

# टर्ब्युलन्समुळे एअर इंडियाच्या विमानात गोंधळ

## १२ प्रवासी किरकोळ जखमी

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
फुकेटहून दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला सोमवारी हवेत टर्ब्युलन्स सामना करावा लागला. यावेळी विमानातील किमान १२ प्रवासी किरकोळ जखमी झाले. विविध वृत्तांनुसार, टर्ब्युलन्सदरम्यान विमान सुमारे ३०० फूट खाली आले होते.
एअर इंडियाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिल्लीत विमान एआय २३७९ सुरक्षितपणे उतरल्यावर प्रवासी आणि कर्मचारी सुखरूप विमानातून बाहेर पडले. तसेच जखमी झालेल्या प्रवाशांना उपचारासाठी विमानतळावरील वैद्यकीय केंद्रात नेण्यात आले. आमच्या प्रवाशांची आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षितता हे एअर इंडियाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. या घटनेमुळे प्रभावित झालेल्या सर्वांना आम्ही आवश्यक ती सर्व मदत पुरवत आहोत आणि या प्रकरणाच्या चौकशीसाठी संबंधित यंत्रणांना पूर्ण सहकार्य करत आहोत असे एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी सांगितले.

# दक्षिणात्य अभिनेते प्रदीप रावत यांचे निधन

**वृत्तसंस्था, मुंबई :** भारतीय चित्रपटसृष्टीतून एक दुखःद बातमी समोर येत आहे. प्रसिद्ध अभिनेते आणि गजनी चित्रपटातील मुख्य खलनायक प्रदीप रावत यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ते कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी झुंज देत होते. उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. लगान चित्रपटातील त्यांचे सहकलाकार यशपाल शर्मा यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत त्यांच्या निधनाची दुःखद माहिती दिली. महाभारत



मधील अश्वत्थामा ते गजनी मधील व्हिलेन अशा विविध भूमिकांमधून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते. मिळालेल्या माहितीनुसार,प्रदिप रावत यांनी कर्करोग झाला होता आणि तो पुन्हा बळावला होता. काही तासांपूर्वीच त्यांचे निधन झाले.ते ७४ वर्षांचे होते आणि त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी व मुलगा विक्रमादित्य असा परिवार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ते गेल्या एका महिन्याहून अधिक काळापासून रुग्णालयात दाखल होते.




# अमानुष कृत्याचा कळस! ९ महिन्यांच्या बाळाच्या तोंडात ओतले फेविक्विक

**वृत्तसंस्था, पुणे**
पुण्यातील लोहगाव परिसरातून मानवतेला काळिमा फासणारी आणि अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. कौटुंबिक वादाचा राग मनात धरून एका महिलेने अवघ्या ९ महिन्यांच्या निष्पाप बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतल्याचा अमानुष प्रकार घडला आहे. याप्रकरणी लोहगाव पोलीस ठाण्यात एका महिलेसह एकूण तिघांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, जखमी बाळावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.
ही भयानक घटना ३१ जुलै रोजी पुण्यातील लोहगाव परिसरातील कलवड वस्ती भागात घडली असून, याप्रकरणी अल्ताफ नबी शेख यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अल्ताफ शेख यांची पत्नी जैनाब आणि तिची भावजय आरोपी सानिया शेख यांच्यात काही कौटुंबिक कारणांवरून सतत वाद सुरू होते. हाच वादाचा राग मनात धरून आरोपी सानिया शेख हिने घरात शांत झोपलेल्या अवघ्या ९ महिन्यांच्या निष्पाप बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या धक्कादायक घटनेनंतर आरोपी सानिया हिने या प्रकाराबाबत कोणालाही माहिती दिली किंवा पोलिसांत फिर्याद दिली तर जीवे मारण्याची थेट धमकी दिली. तसेच, इतर दोन आरोपींनीदेखील फिर्यादी अल्ताफ शेख यांना सानियाविरोधात पोलीस तक्रार केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा धाक दाखवल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.
घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने बाळाच्या आईने त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. सुदैवाने डॉक्टरांच्या वेळेवर उपचारांमुळे बाळाचा जीव वाचला असून सध्या त्याच्यावर रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

संपादकीय लेखणीतून...

## 'स्मार्टचा' वाद

महाराष्ट्रात सध्या स्मार्ट इलेक्ट्रीसिटी मीटर्स हा विषय चर्चेचा आणि वादाचा मुद्दा ठरला आहे. राज्यभरात महावितरणचे स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू असताना अनेक ग्राहकांनी वीज बिले अचानक वाढल्याचा दावा केला आहे. काही नागरिकांनी ग्राहकांची संमती न घेता मीटर बदलले जात असल्याचा आरोप केला आहे. यामुळे स्मार्ट इलेक्ट्रीसिटी मीटर्स संदर्भातील हा वाद केवळ सोशल मीडियापुरता मर्यादित राहिला नाही तर तो आता न्यायालयापर्यंत पोहोचला आहे. सरकार आणि महावितरण या मीटरमुळे बिलिंग अधिक अचूक होईल, वीजचोरी कमी होईल आणि भविष्यातील स्मार्ट वीज व्यवस्थेला चालना मिळेल, असा दावा करत आहेत मात्र ग्राहक संघटना आणि विरोधक पारदर्शकता, बिलांची अचूकता आणि ग्राहकांच्या अधिकारांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत आहेत. राज्यात स्मार्ट मीटर्स बसवण्याची मोहीम वेगाने सुरू असली तरी त्या सोबत अनेक प्रश्नही समोर येत आहेत. केंद्र सरकारने २०१७ मध्ये स्मार्ट मीटर राष्ट्रीय कार्यक्रम सुरू केला. त्यानंतर २०२१ मध्ये पुनर्रचित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (आरडीएसएस स्कीम) वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसवण्यासाठी आर्थिक मदत दिली. या योजने अंतर्गत महाराष्ट्रातही स्मार्ट मीटर राबविण्याची मोहीम मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. राज्य वीज मंडळाने सुमारे १.७२ कोटी स्मार्ट मीटर्स बसवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्यासाठी विविध कंपन्यांशी करार केले आहेत मात्र स्मार्ट मीटर्स बसवताना ग्राहकांची पूर्वसंमती घेतली जात नसल्याचा आरोप अनेक नागरिकांनी केला आहे. अनेक ठिकाणी जुने मीटर व्यवस्थित सुरू असतानाही ते बदलण्यात आल्याने ग्राहकांनी नाराजी व्यक्त केली आहे त्यामुळे हा विषय केवळ तांत्रिक न राहता ग्राहक हक्क आणि पारदर्शकतेचा मुद्दा बनला आहे. स्मार्ट मीटर बसवण्यापूर्वी ग्राहकांची परवानगी आवश्यक आहे का? हा सध्या सर्वांत मोठा प्रश्न आहे. काही ठिकाणी मीटर बदलल्यानंतरच नागरिकांना त्याची माहिती दिली जात आहे.

ग्राहक संघटनांचे मत आहे की, मीटर बदलण्यापूर्वी स्पष्ट माहिती आणि लेखी संमती घेणे आवश्यक आहे. यावर एमएसइडीसीएलचे म्हणणे आहे की, वीज मीटर ही वितरण कंपनीची मालमत्ता असल्याने मीटर बदलण्यासाठी स्वतंत्र ग्राहक संमतीची आवश्यकता नाही. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर अनेक भागात वाढीव वीज बिलाबाबत तक्रारी केल्या जात आहेत. काही ग्राहकांनी आधीपेक्षा दोन ते तीन पट जास्त बिल आल्याचा दावा केला आहे मात्र संबंधित कंपन्यांचे म्हणणे की, स्मार्ट मीटर अधिक अचूक रीडिंग घेते त्यामुळे जुने मीटर चुकीचे वाचन करत असतील तर नवीन बिल जास्त दिसू शकते. कंपनीच्या मते स्मार्ट मीटर्समुळे रिअल-टाईम रीडिंग मिळते आणि बिलिंग अधिक अचूक होते. मॅन्युअल मीटर रीडिंगवरील अवलंबित्व कमी होते. वीजचोरी रोखणे, वितरणातील नुकसान कमी करणे आणि तांत्रिक सेवा अधिक कार्यक्षम करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. ग्राहकांचे म्हणणे आहे की, स्मार्ट मीटरसाठी ग्राहकांची संमती घेणे आवश्यक आहे. मीटर बदलण्यापूर्वी ग्राहकांना लेखी सूचना द्यावी, त्यांच्या शंका दूर कराव्यात आणि त्यानंतरच नवीन मीटर बसवावेत तसेच स्मार्ट मीटर बसवल्यानंतर बिलात काही त्रुटी आढळल्यास त्याची तातडीने चौकशी करून ग्राहकांना न्याय मिळावा.

या शिवाय तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम कराव्यात, अनावश्यक वीजपुरवठा खंडित होणार नाही याची काळजी घेण्यात यावी आणि पारदर्शक पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया राबवली जावी. स्मार्ट मीटरवाद आता न्यायालयापर्यंत पोहोचला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेत ग्राहकांची संमती, मीटर बदलण्याची प्रक्रिया आणि भविष्यातील सुविधांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. कंपनीचे म्हणणे आहे की, सध्या बसवले जाणारे स्मार्ट मीटर हे पूर्णपणे पोस्टपेड आहेत. ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे आरोप योग्य नाहीत मात्र, भविष्यात प्रीपेड सुविधा लागू केल्यास ग्राहकांना पूर्वकल्पना दिली जाईल का आणि त्या संबंधीचे नियम काय असतील? याबाबत न्यायालयाने राज्य सरकार आणि वीज कंपनीकडून स्पष्ट भूमिका मागितली आहे. स्मार्ट मीटर बसवण्याच्या प्रक्रियेवरून राज्यात राजकीय पक्ष, ग्राहक संघटना आणि नागरिकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांचा मुख्य उद्देश तंत्रज्ञानाला विरोध करण्याचा नसून ते राबवण्याच्या पद्धतीबाबत आहे. एकंदरीत स्मार्ट मीटरचा वाद हा केवळ तांत्रिक नसून ग्राहक हक्क, पारदर्शकता आणि विश्वासाशी जोडलेला मुद्दा बनला आहे. एका बाजूला वीज वापराचे रिअल-टाईम निरीक्षण, अचूक बिलिंग आणि ऊर्जा बचतीसारखे फायदे आहेत तर दुसऱ्या बाजूला संमती, डेटा सुरक्षा आणि वाढीव बिलांबाबतच्या तक्रारी आहेत.

स्मार्ट मीटर बसवले जात असताना नागरिकांनीही काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घ्यायला हवी. मीटर बदलण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांची ओळखपत्रे तपासावीत, मीटर बसवल्यानंतर त्याचा क्रमांक, सुरुवातीचे रीडिंग आणि इन्स्टॉलेशनची पावती जपून ठेवावी. त्यानंतर काही महिन्यांचे वीज बिल आणि वापराची तुलना करून अचानक मोठा फरक दिसत असल्यास त्याबाबत वीज वितरण कंपनीकडे लेखी तक्रार नोंदवावी तसेच आवश्यक असल्यास मीटरची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणी करावी. वीज वापरावर नियमितपणे लक्ष्य ठेवल्यास घरातील वीज वापराचे स्वरूप समजते आणि अनावश्यक वापर कमी होण्यास मदत होते. डीजिटल इलेक्ट्रीसिटी मीटर्स हे केवळ बिल तयार करणारे उपकरण नसून ऊर्जा व्यवस्थापनाचे साधन ठरू शकते मात्र त्यासाठी ग्राहकांमध्ये जागरूकता, वितरण कंपन्यांकडून पारदर्शक माहिती आणि प्रभावी तक्रार निवारण व्यवस्था असणे तितकेच आवश्यक आहे.

# समूह माध्यमांवरील चिखलफेक!

झाडाझडती



विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार

सोशल मीडियाचं समाज माध्यम हे भाषांतर फारसं पटणारं नाही. मुळात सोशल मीडिया हा शब्दप्रयोगच चुकीचा आहे. फेसबुक, मेसेंजर, एक्स, व्हाट्सअप, इन्स्टाग्राम, यूट्यूब वगैरेंना सोशल मीडिया म्हणायचं तर, वर्तमानपत्रे, टीव्ही, डिजिटल मीडियाचे इतर प्रकार हे सोशल नसतात का, असा प्रश्न उद्भवतो. सोशल मीडियात ग्रुप्स असतात. एकट सदस्याला सुद्धा हजारो/लाखो लोकांचा प्रतिसाद मिळत असतो. हे सारं पाहता याला ग्रुप मीडिया/समूह माध्यम म्हणणंच जास्त सयुक्तिक ठरेल. आमचे कविमित्र, माध्यमतज्ज्ञ आणि मराठीच्या प्रतिष्ठेसाठी सतत संघर्ष करणारे डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी सोशल मीडियाला समूह माध्यम हाच प्रतिशब्द आवर्जून वापरत असतात. आपणही वापरायला हरकत नसावी.

तर, या समूह माध्यमांवर सध्या काय सुरू आहे? नीट परीक्षा पेपरफूट, काक्रोच जनता पार्टी, दिल्लीतील जंतर-मंतरवर झालेलं आंदोलन, केंद्रीय उच्च शिक्षण मंत्री धर्मेन्द्र प्रधान यांचा राजीनामा वगैरे. तरीही विषय संपता संपत नाही. विषय महत्त्वाचा आणि तरुण पिढीच्या जिव्हाळ्याचा आहे यात शंका नाहीच. पण त्यानिमित्तानं समूह माध्यमांवर व्यक्त होणारी मतं पाहिली की वाटतं, या लोकांना समस्या सोडवून पुढं जायचं आहे की झालेल्या गैरप्रकाराचं भांडवल करून एकमेकांचं उणंदुणं काढत विषय लांबवत ठेवायचा आहे किंवा पेटता ठेवायचा आहे? आपापल्या बाजूच्या राजकीय पक्षांना/मतांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी तर हा खेळ सुरू नाही ना? या प्रकरणात मत व्यक्त करण्यासाठी वापरण्यात येणारी असभ्य भाषा, आंदोलनकाळातील अर्वाच्च घोषणा-प्रतिघोषणा, एकमेकांना काट देणारे रील्स, व्हिडिओज, फोटो, कार्टून्स वगैरेंचा दर्जा पाहिल्यावर, याच्याशी काहीही संबंध नसलेल्या लाखो-कोटी लोकांना हेच वाटतं की, हे सारं राजकारणप्रेरितच आहे. सीजेपी या पक्षानं आंदोलनासाठी जंतर-मंतर गाठलं अन् मगच विरोधी पक्षांना खडबडून जाग आला! राहुल गांधी आणि प्रियांका वाड्रा या काँग्रेसच्या मुख्य नेत्यांनी थेट पंतप्रधान निवासाजवळच धरणं दिलं, संसदेवर चालून जाण्याचाही प्रयत्न झाला. खऱ्या अर्थानं देशाची राजधानी असलेला हा परिसर सर्वाधिक संवेदनशील आणि आंदोलनांसाठी प्रतिबंधित आहे, पूर्वपरवानगी आवश्यक असते या गोष्टी लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्याला माहीत नाहीत, असं समजायचं का? सीजेपीच्या व्यासपीठावर जाणं टाळण्यासाठी ही वेगळी चूल मांडण्यात आली, हे सामान्य देशवासीयांना सुद्धा समजलं. त्याचा राजकीय लाभ पक्षोपपक्षांनी आपापल्या परीनं घेतला.

जंतर-मंतरवरील आंदोलनात हिंसाचार, पोलिसांचा लाठीमार, वाटाघाटी, समेट, राजीनामा, चौकशी हे सगळं झाल्यावरही प्रकरण मात्र मिटलेलं नाही. दोन्ही बाजूंनी एकमेकाला उघडं पाडण्याचे प्रकार समूह माध्यमांवर सुरूच आहेत. आंदोलक मुलींनी अश्लील शिवीगाळ, असभ्य वर्तन केल्याचा सत्ताधारी पाठीराख्यांचा आरोप आहे. तर, शिवी देणं हा काही गुन्हा नाही, असा दावा आंदोलनाचे समर्थक करीत आहेत. दोन्ही बाजूंच्या रील्स, व्हिडिओज यांना अक्षरशः उधाण आलं आहे. त्यांच्या तपासणीतून त्यांचा खरेखोटेपणा उघड होईपर्यंत त्यांचा हेतू साध्य होत आहे आणि समूह माध्यमांवर अतिशय वाईट पद्धतीनं प्रतिक्रियांचा पाऊस पडत आहे. याचा अर्थ, समूह माध्यमांचा कसाही आणि अनियंत्रित वापर सध्या सुरू आहे. भविष्यासाठी ही धोक्याची घंटा ठरू शकते.

आंदोलकांवर गुन्हे दाखल करायचे नाही, असं सरकारनं ठरवलं असतानाच, "माझ्यासह माझ्या दिवंगत मातेलाही अर्वाच्य शिवीगाळ केली. अशा भरकटलेल्या मुलामुलींना माफ करून योग्य मार्गावर आणलं पाहिजे" असं विधान पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी केलं. यावर राहुल गांधींनी मागणी केली की, "त्यांना तुमच्याकडून माफी नको. तुम्ही त्यांची माफी मागा!" म्हणजे तिढा कायमच. अश्लील शिवीगाळ, पंतप्रधानांची तेरवी, हिंसाचार, समाजकंटकांचा सहभाग वगैरे गोष्टींवर काहीच कारवाई करायची नाही का, हा सत्तापक्षाचा प्रश्न एकीकडे आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, पोलिसांचा लाठीमार, आश्वासन देऊनही काही प्रमाणात कारवाई वगैरेंवरून विरोधकांचा सरकारवर निशाणा दुसरीकडे. यातून मध्यममार्ग काढणं जिकिरीचं होत चाललं आहे.

असा मार्ग दोन्ही बाजूंच्या गरजेतून निघेलही. परंतु या प्रकरणाचं राजकारण मात्र संपणार नाही. कारण, सीजेपीला संपूर्ण राजकीय पक्ष व्हायचं आहे, असं अभिजित दीपकेंच्या बोलण्यातून जाणवत आहे. (सत्तेविरोधात नवा वाटेकरी आला तर आमचं कसं, हा प्रश्न काँग्रेसला आता पडला असणार!) राजकारणाचं जे व्हायचं ते होईल. पण आज, तेही समूह माध्यमांवर आणि काही इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर सुद्धा, जी चिखलफेक, अत्यंत खालच्या पातळीवर सुरू आहे, त्याचं काय, हा खरा चिंतेचा विषय आहे. यात सहभागी सर्वांनीच स्वतःला आवर घातला पाहिजे. त्यापेक्षाही, ज्यांच्यासाठी ते हा आगाऊपणा करीत आहेत त्यांनीही त्यांचे कान उपटले पाहिजे. नाहीतर समूह माध्यम नावाचा राक्षस सर्वांनाच सारखा महागात पडू शकतो. जेन झीनं सावध राहिलं पाहिजे.

**- ज्येष्ठ पत्रकार, नागपूर**

# इस्त्रायल-भारत शस्त्र व्यवहारः आंतरराष्ट्रीय अहवालावर भारताचे अधिकृत स्पष्टीकरण

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

इस्त्रायल आणि भारताचे संबंध प्रामुख्याने रणनीतिक आणि संरक्षण सहकार्यावर आधारित आहेत. भारत हा इस्त्रायलच्या शस्त्रास्त्रांचा मोठा खरेदीदार आहे, तर दुसरीकडे गाझा युद्धादरम्यान भारताकडून इस्त्रायलला शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा पुरवल्या गेल्याचे अहवाल समोर आले आहेत.भारतामधील सरकारी आणि खाजगी कंपन्या इस्त्रायलला शस्त्रास्त्रे आणि दारुगोळ्याचे घटक पुरवत असल्याचे आंतरराष्ट्रीय अहवालांमध्ये समोर आले आहे.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनल आणि इतर वृत्तसंस्थांच्या अहवालानुसार, भारताने इस्त्रायल-गाझा संघर्ष सुरू झाल्यानंतर इस्त्रायलला रॉकेट इंजिन, स्फोटके आणि शस्त्रास्त्रांचे शेकडो टन घटक निर्यात केले आहेत.

गाझा पट्टीमध्ये इस्त्रायल आणि हमास यांच्यात सुरू असलेल्या भीषण युद्धाच्या पार्श्वभूमीवर, भारताच्या संरक्षण निर्यातीचा मुद्दा जागतिक स्तरावर चर्चेत आला आहे. प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल' ने एक सविस्तर अहवाल प्रसिद्ध करून भारताकडून इस्त्रायलला होणाऱ्या शस्त्र आणि दारुगोळा पुरवठ्यावर गंभीर आक्षेप घेतले आहेत. या अहवालामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर राजकीय खळबळ माजली असून, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने यावर अत्यंत स्पष्ट, कायदेशीर आणि धोरणात्मक भूमिका मांडत हे आरोप फेटाळले आहेत.

**ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या अहवालात करण्यात आलेल्या आरोपात**

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने 'मेड इन इंडियाः द सप्लाय ऑफ वेपन्स अँड ॲम्युनिशन टू इस्त्रायल' या शीर्षकाखाली एक सविस्तर अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात भारत-इस्त्रायल दरम्यानच्या संरक्षण व्यापारावर खालील गंभीर आरोप करण्यात आले आहे. गाझामध्ये सुरू असलेल्या लष्करी कारवाईदरम्यानही भारताने इस्त्रायलला शस्त्रास्त्रे, दारुगोळा, सुटे भाग आणि इतर लष्करी साहित्याचा पुरवठा सुरूच ठेवला आहे, असा दावा भारताच्या निर्यात आकडेवारीचे विश्लेषण करून करण्यात आला आहे.या अहवालात भारत सरकारच्या थेट नियंत्रणाखालील किंवा मालकीच्या काही प्रमुख संरक्षण कंपन्यांचा उल्लेख करण्यात आला आहे, ज्यांच्या माध्यमातून हे साहित्य इस्त्रायली संरक्षण कंपन्यांना पाठवले गेले.

ॲम्नेस्टीच्या महासचिव ॲग्नेस कॅलामार्ड यांनी म्हटले आहे की, "गाझामधील कथित नरसंहाराबाबत जगभरातून सातत्याने पुरावे समोर येत आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने जारी केलेल्या अंतरिम आदेशात गाझामधील पॅलेस्टिनींविरुद्ध संभाव्य नरसंहाराचा धोका मान्य केला आहे. अशा परिस्थितीत इस्त्रायलला शस्त्रपुरवठा करणे म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्यांचे गंभीर उल्लंघन होण्याचा धोका आहे आणि भारतीय अधिकाऱ्यांना याची माहिती नव्हती असे म्हणता येणार नाही." ॲम्नेस्टीने भारत सरकारला इस्त्रायलला होणाऱ्या सर्व प्रकारच्या लष्करी साहित्याच्या निर्यातीस तातडीने स्थगिती देण्याचे आवाहन केले आहे.

**भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे स्पष्टीकरणः**

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या या अहवालावर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी भारताची कायदेशीर आणि धोरणात्मक बाजू अत्यंत कणखरपणे मांडली. भारताने कोणत्याही दबावाला बळी न पडता आपल्या सार्वभौम नियामक व्यवस्थेचे समर्थन केले आहे.जयस्वाल यांनी स्पष्ट केले की, धोरणात्मक व्यापार नियंत्रणाबाबत भारताकडे अत्यंत पारदर्शक, मजबूत आणि जागतिक दर्जाची कायदेशीर व नियामक व्यवस्था आहे. भारत आपली कोणतीही निर्यात करताना राष्ट्रीय कायद्यांचे आणि आंतरराष्ट्रीय करारांचे संपूर्ण पालन करतो.भारताकडून होणारी निर्यात ही प्रामुख्याने दुहेरी उपयोगाचे, म्हणजेच नागरी आणि लष्करी अशा दोन्ही कामांसाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान आणि वस्तूंची असते. ही प्रक्रिया संपूर्णपणे कायदेशीर चौकटीत आणि आवश्यक परवानग्यांसह पार पाडली जाते.

भारताच्या या भूमिकेवरून हे स्पष्ट होते की, भारताची संरक्षण निर्यात ही कोणत्याही देशाच्या द्विपक्षीय युद्धाला किंवा हिंसाचाराला पाठिंबा देण्यासाठी नसून, ती एका स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राची अधिकृत व्यापारी प्रक्रिया आहे.

**देशांतर्गत राजकीय पडसाद आणि विरोधकांची टीकाः**

या आंतरराष्ट्रीय अहवालाचे भारतीय राजकारणातही तीव्र पडसाद उमटले आहेत. मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. काँग्रेसचे प्रवक्ते आणि खासदार पवन खेडा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर (ट्विटर) लिहिले की, "ही एक मोठी शोकांतिका आहे की, महात्मा गांधी आणि अहिंसेची भूमी असलेला भारत आज दुसऱ्या देशाच्या बेकायदेशीर युद्धात सामील झाला आहे."त्यांनी भाजप सरकारच्या धोरणांवर टीका करताना कर्माच्या सिद्धांताचा हवाला दिला. "निरपराध लोकांवरील हिंसाचाराचे परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीत. प्रत्येक अन्यायकारक कृत्यामुळे एक विशिष्ट प्रतिक्रिया उमटते आणि मोदी सरकारचे हे दरबारी कामकाज शेवटी धुळीत मिळेल," अशी तीव्र टीका त्यांनी केली.

**माजी मुख्य न्यायमूर्ती एस. मुरलीधर यांचा संयुक्त राष्ट्रांचा अहवालः**

याच काळात, भारताचे प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ आणि ओडिशा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश एस. मुरलीधर यांच्या एका अहवालामुळेही या प्रकरणाला अधिक धार आली आहे. संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदने त्यांची एका स्वतंत्र आंतरराष्ट्रीय चौकशी आयोगाच्या प्रमुखपदी नियुक्ती केली होती. न्यायमूर्ती मुरलीधर यांनी सादर केलेल्या अहवालात असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, इस्त्रायली लष्कराने गाझामधील पॅलेस्टिनी मुलांना हेतुपुरस्सर आणि पद्धतशीरपणे लक्ष्य केले आहे, जेणेकरून त्या प्रदेशाचे अस्तित्व आणि भविष्य नष्ट करता येईल. दरम्यान, इस्त्रायल सरकारने हा संयुक्त राष्ट्रांचा अहवाल पूर्वग्रहदूषित असल्याचे सांगत पूर्णपणे फेटाळून लावला आहे.

ऑक्टोबर २०२३ नंतर भारताकडून इस्त्रायलला हजारो मेट्रिक टन स्फोटके आणि लष्करी साहित्याच्या हजारो शिपमेंट पाठवण्यात आल्या आहेत. भारताच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत दोन्ही देश मिळून संरक्षण उपकरणे आणि शस्त्रास्त्रांची निर्मिती करत आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, भारताची शस्त्रास्त्र निर्यात ही देशाच्या राष्ट्रीय हितावर आणि सुरक्षा धोरणावर आधारित असते.

**भारत-इस्त्रायल संबंधांचा ऐतिहासिक आणि सद्य प्रवासः**

दोन्ही देशांमध्ये अधिकृत राजनैतिक संबंधांची सुरुवात जानेवारी १९९२ मध्ये झाली. त्यापूर्वी भारताची भूमिका प्रामुख्याने पॅलेस्टाईनच्या बाजूने झुकलेली होती.

२०१४ नंतरची नवी उंचीः २०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर भारत आणि इस्त्रायलमधील संबंध एका नव्या धोरणात्मक भागीदारीत बदलले. पंतप्रधान मोदी यांनी इस्त्रायलचा ऐतिहासिक दौराही केला होता.गेल्या दोन दशकांत भारत आणि इस्त्रायल दरम्यान अब्जावधी डॉलर्सचा संरक्षण व्यापार झाला असून, इस्त्रायल हा भारताला अत्याधुनिक लष्करी तंत्रज्ञान उदा. ड्रोन्स, रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, पुरवणारा एक प्रमुख देश बनला आहे

इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतन्याहू यांनीही भारताशी असलेल्या घट्ट मैत्रीचा उल्लेख करताना म्हटले होते की, अमेरिकेव्यतिरिक्त १४० कोटी लोकसंख्या असलेला भारत हा आमचा मोठा मित्र आहे आणि तिथल्या जनतेकडून आम्हाला सोशल मीडियावर प्रचंड पाठिंबा मिळतो.

**गाझा संघर्षाची भीषण पार्श्वभूमीः**

या संपूर्ण वादाच्या केंद्रस्थानी गाझा पट्टीमधील मानवतावादी संकट आहे.

युद्धाची सुरुवातः ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमास या दहशतवादी संघटनेने इस्त्रायलवर भीषण हल्ला केला, ज्यामध्ये १,२०० लोकांचा मृत्यू झाला आणि २५० हून अधिक जणांना ओलीस धरण्यात आले. भारताने या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला होता. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलने गाझामध्ये सुरू केलेल्या लष्करी कारवाईत आतापर्यंत ७३,००० हून अधिक पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे, ज्यामध्ये २१,००० हून अधिक निष्पाप मुलांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेही या आकडेवारीला विश्वसनीय मानले आहे.

**भारताची राजनैतिक समतोल साधण्याची कसरत**

अँमेस्टी इंटरनॅशनलच्या अहवालाने भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेरण्याचा प्रयत्न केला असला, तरी भारताने आपल्या मजबूत कायदेशीर चौकटीचे दाखले देत हा दबाव फेटाळला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत सध्या अत्यंत कौशल्याने दुहेरी भूमिका बजावत आहे. एका बाजूला दहशतवादाचा निषेध करत इस्त्रायलसारख्या धोरणात्मक आणि विश्वासू मित्राची साथ राखणे, तर दुसऱ्या बाजूला गाझामधील मानवतावादी संकटाबद्दल चिंता व्यक्त करत पॅलेस्टाईनसाठी स्वतंत्र 'द्वि-राष्ट्र तोडगा' हाच एकमेव मार्ग असल्याचे सांगणे; अशी एक अत्यंत संतुलित आणि परिपक्व राजनैतिक कसरत भारताकडून केली जात आहे.

**- ९५६१५९४३०६**

# आकिब नबीसाठी टिम इंडियाचा दरवाजा अखेर उघडलाच

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

जम्मू-काश्मीरच्या खोऱ्यातून एका नव्या ताऱ्याचा भारतीय क्रिकेटच्या पटलावर उदय झाला आहे! आपल्या स्विंग, अचूक टप्पा आणि वेगाच्या जोरावर देशांतर्गत क्रिकेटमध्ये धुमाकूळ घालणारा वेगवान गोलंदाज आकिब नबी याची अखेर भारतीय कसोटी संघात (टिम इंडिया) निवड झाली आहे. दुखापतग्रस्त जसप्रीत बुमराहच्या जागी श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेसाठी त्याची संघात वर्णी लागली आहे.

परवेझ रसूलनंतर भारतीय संघात स्थान मिळवणारा आकिब हा जम्मू-काश्मीरचा केवळ दुसराच खेळाडू ठरला आहे. बारामूलाच्या गल्ल्यांपासून ते टीम इंडियाच्या निळ्या-पांढऱ्या जर्सीपर्यंतचा त्याचा हा प्रवास अत्यंत खडतर आणि तितकाच प्रेरणादायी आहे.

**बारामूला ते टीम इंडियाः संघर्षाची कहाणी**

आकिब नबीचा जन्म ४ नोव्हेंबर १९९६ रोजी उत्तर काश्मीरमधील बारामूल्ला जिल्ह्यातील 'शिरी' या छोट्याशा गावात झाला.

वडिलांचे स्वप्न आणि आकिबची जिद्दः आकिबचे वडील गुलाम नबी डार हे पेशाने शिक्षक आहेत. इतर सर्वसामान्य कुटुंबांप्रमाणे त्यांच्याही वडिलांची इच्छा होती की आकिबने शिकून डॉक्टर बनावे. परंतु, आकिबच्या मनात क्रिकेटची आवड इतकी खोलवर रुजली होती की त्याने अभ्यासासोबतच हातातील चेंडू कधीच सुटू दिला नाही.

साधनांचा अभाव अन् उधारीचे शूजः काश्मीरमधील प्रतिकूल हवामान, बर्फाच्छादित रस्ते आणि तुटपुंज्या क्रीडा सुविधा या सर्वांवर मात करत त्याने सराव सुरु ठेवला. सुरुवातीच्या काळात क्रिकेट किट आणि चांगल्या शूजसाठीही त्याच्याकडे पैसे नसायचे; कित्येकदा मित्रांकडून शूज उधार घेऊन त्याने सामने खेळले आहेत.

इरफान पठाणचे मार्गदर्शन अन् कलाटणी काश्मीर क्रिकेट संघात जेव्हा भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाण मार्गदर्शक (मटॉर) म्हणून आला, तेव्हा आकिबच्या कारकिर्दीला खरी कलाटणी मिळाली.

इरफानने आकिबमधील प्रतिभेला ओळखले आणि त्याच्या गोलंदाजीतील इन-स्विंग व आऊट-स्विंगवर बारकाईने काम केले. इरफानने दिलेल्या आत्मविश्वासाच्या बळावर आकिबने देशांतर्गत क्रिकेटमध्ये एकापाठोपाठ एक विक्रम रचण्यास सुरुवात केली.

**देशांतर्गत क्रिकेटमधील वादळी कामगिरी**

आकिब नबीने २०१८ मध्ये जम्मू-काश्मीरसाठी पदार्पण केले, पण गेल्या दोन मोसमांत त्याने विरोधी फलंदाजांवर अशी काही दहशत निर्माण केली की निवडकर्त्यांना त्याची दखल घेणे भाग पडलेः

रणजी ट्रॉफी २०२५-२६ चा महानायकः या मोसमात आकिबने १० सामन्यांत १२.६५ च्या सरासरीने तब्बल ६० बळी टिपले आणि 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'चा किताब पटकावला.

ऐतिहासिक विजयः त्याच्या याच कामगिरीच्या जोरावर जम्मू-काश्मीरने इतिहास रचत पहिल्यांदाच रणजी ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले.

आयपीएल लिलाः त्याच्या या कामगिरीमुळेच आयपीएल २०२६ च्या लिलावात दिल्ली कॅपिटल्सने त्याला तब्बल ८.४० कोटी रुपयांची मोठी बोली लावून आपल्या ताफ्यात सामील केले.

हॅटट्रिक अन् अष्टपैलू चुणूकः दुलीप ट्रॉफीमध्ये नॉर्थ झोनकडून खेळताना त्याने ईस्ट झोनविरुद्ध लागोपाठ ४ चेंडूंत ४ बळी घेण्याची ऐतिहासिक किमया केली होती. तसेच, तो तळाला येऊन उपयुक्त फलंदाजी करण्यातही पटाईत आहे.

**स्वप्नपूर्तीः 'जसप्रीत बुमराहचा पर्याय'**

ऑगस्ट २०२६ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी जेव्हा जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे बाहेर पडला, तेव्हा निवड समितीने कुठलाही विचार न करता देशांतर्गत क्रिकेटमध्ये ६० बळी घेणाऱ्या या ३० वर्षीय वेगवान गोलंदाजावर विश्वास दाखवला.

**- ९०९६३७२०८२**

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# जनजागृती मंडळ व सांस्कृतिक शाहीर मंचतर्फे लोककलाकारांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जनजागृती कलंगी शाहिर मंडळ, मोहाडी व सांस्कृतिक शाहिर कला मंच, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कलावंतांच्या रंगारंग कार्यक्रमात लोककलावंतांचा सत्कार करण्यात आला. रविवारी हनुमान नगर, भांडेवाडी रेल्वे स्टेशन रोड, पारडी हा कार्यक्रम पार पडला.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक पुरुषोत्तम हजारे, नगरसेवक राजु दिवटे, सचिन घोडमारे, राजुकुमार घुले, पंकज शेळ्के, जनजागृती कलंगी शाहीर मंडळ, मोहाडीचे सचिव व्यंकटराव गजभिये तसेच नरेश वासनिक उपस्थित होते. अध्यक्षस्थानी जनजागृती कलंगी शाहीर मंडळ, मोहाडीचे अध्यक्ष माणिकराव देशमुख होते.

यावेळी मोरेश्वर मेश्राम, अंबादास नागदेवे, अलंकार टेंभुर्णे, चरण शेंडे, ब्रह्मा नवघरे, केशव नारनवरे, पुरुषोत्तम खांडेकर, संजय मेश्राम, गौरीशंकर गजभिये, सचिन कडू आणि सपान राऊत या शाहिरांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाहिर राजू कानसकर, गुणीराम रत्नापुरे, भगवान गणवीर, दीपक निकम, महेश शेंडे, वानखेडे, निशांत सुखदेवे, ज्ञानेश्वर वाघमारे, मारोती मार्बते, विष्णुदास माटे, उत्तम खांडेकर आदी या कलाकारांनी देशभक्तीपर गीते, साक्षरता अभियानावर एकपात्री सादरीकरण, वादन, नृत्य सादरीकरण केले.

यावेळी जनजागृती कलंगी शाहीर मंडळाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे पदाधिकारी विनोद राउत, भारत वहिले, अनिल ठाकरे आणि सोनबाजी हुलके यांची सुद्धा उपस्थिती होती.

## तुमसर हादरले! लॉजमधील हायप्रोफाईल वेश्याव्यवसाय रॅकेटचा पर्दाफाश

### तुमसर पोलीस व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची धडाकेबाज कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

तुमसर शहरात एका लॉजच्या आडोशाने राजरोसपणे सुरू असलेल्या वेश्याव्यवसाय रॅकेटचा स्थानिक पोलिसांनी पदार्फाश केला आहे. पोलीस स्टेशन तुमसर आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या संयुक्त पथकाने केलेल्या या धडाकेबाज कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी तुमसर शहरातील एका लॉजमध्ये अवैध देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची दखल घेत पोलीस निरीक्षक सुभाष बारसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचला.

पोलिसांच्या पथकाने संबंधित लॉजवर अचानक छापा टाकला. या कारवाईत पाच पुरुष आणि एक महिला आरोपी रंगेहाथ सापडले. घटनास्थळावरून दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, त्यांना वैद्यकीय तपासणीनंतर त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन तुमसर येथे 'अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६' च्या कलम ३, ४ आणि ५ अन्वये गुन्हा (गुन्हा क्र. ८९०/२०२६) दाखल करण्यात आला आहे.

ही धाडसी कारवाई भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नूरुल हसन आणि अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत तुमसर चे पोलीस निरीक्षक सुभाष बारसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र लांडे, रवींद्र रेवतकर, महिला पोलीस हवालदार अर्चना कुथे, मंजुषा घरडे, अनैतिक मानवी वाहतूक कक्षाचे माणिक किसान, तसेच नेमूताई गाढवे, पोलीस अंमलदार चौधरी आणि गिरीपुंजे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिसांच्या या तत्परतेमुळे शहरातील अवैध धंद्यांवर वचक निर्माण झाला असून, नागरिकांकडून या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## कर्जमुक्ती योजनेची पहिली यादी जाहीर

### पात्र शेतकऱ्यांना तातडीने आधार प्रमाणीकरणाचे आवाहन, उर्वरित याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध होणार

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली असून, उर्वरित याद्या टप्प्याटप्प्याने जाहीर केल्या जाणार आहेत. पहिल्या यादीतील पात्र शेतकऱ्यांनी विशिष्ट क्रमांकासह 'आपले सरकार सेवा केंद्र' येथे जाऊन तातडीने आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन भिवापूरचे तहसीलदार तहसीलदार संजय राठोड तसेच उमरेड-भिवापूरचे सहाय्यक निबंधक यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत थकीत पीक कर्जधारक शेतकऱ्यांना मुद्दल व व्याजासह कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तर नियमितपणे पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

योजनेच्या निकषांनुसार, १ एप्रिल २०१९ ते ३० मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले पीक कर्ज ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असणे आवश्यक आहे. अल्पमुदतीच्या कर्जाचे मध्यम मुदतीत पुनर्गठन झालेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असल्यास, अतिरिक्त रक्कम संबंधित बँकेत भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी लागू होईल. तसेच, यापूर्वी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ मिळू शकतो.

प्रोत्साहनपर लाभासाठी सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी किमान दोन वर्षे पीक कर्ज घेऊन त्याची मुदतीत परतफेड केलेली असणे आवश्यक आहे. अशा पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर रक्कम दिली जाणार आहे.

दरम्यान, पात्र शेतकऱ्यांच्या याद्या तहसील कार्यालय, ग्रामपंचायत आणि संबंधित बँकांच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरणासह ॲग्रीस्टॅकवर नोंदणी अनिवार्य असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटलच्या विद्यार्थ्याने पटकावले सुवर्णपदक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एनकेपी साळवे वैद्यकीय महाविद्यालय व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूरचे विद्यार्थी डॉ. अभिषेक सोनकुसरे यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (टवल्र), नाशिक आयोजित एमएस (स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र) परीक्षेत प्रतिष्ठेचे डॉ. बी. एन. पुरंदरे सुवर्णपदक प्रदान करण्यात आले आहे.



या उल्लेखनीय यशामुळे प्रसूतिशास्त्र व स्त्रीरोग विभागाने तिसऱ्यांदा हे मानाचे सुवर्णपदक मिळविण्याची किमया साधली असून, विभागाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक उत्कृष्टतेची ही साक्ष आहे.

या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष आमदार डॉ. आशिषराव देशमुख, अधिष्ठाता डॉ. सजल मित्रा, उपअधिष्ठाता (क्लिनिकल) व वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन देवस्थळे, प्रसूतिशास्त्र व स्त्रीरोग विभागाच्या प्राध्यापिका व विभागप्रमुख डॉ. अनुजा भलेराव तसेच विभागातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी डॉ. अभिषेक सोनकुसरे यांचे अभिनंदन करून त्यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक केले.

आपल्या यशाबद्दल भावना व्यक्त करताना डॉ. अभिषेक सोनकुसरे यांनी सांगितले की, विभागातील सर्व शिक्षक व मार्गदर्शकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि पाठबळ यामुळेच हे यश संपादन करता आले. त्यांच्या अमूल्य शिक्षणाने व प्रेरणेने हा महत्त्वाचा टप्पा गाठणे शक्य झाले, अशी कृतज्ञताही त्यांनी व्यक्त केली.

# माळी महासंघ, नागपूरतर्फे १४० गुणवंत विद्यार्थी व ३६ नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा भव्य गुणगौरव सोहळा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

माळी महासंघ, नागपूर शहर व ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील १४० गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा तसेच नुकत्याच निवडून आलेल्या ३६ नगरसेवकांचा भव्य गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास समाजबांधव, पालक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.




कार्यक्रमाच्या प्रारंभी मुकुंद पोटदुखे यांनी प्रास्ताविकातून गुणगौरव सोहळ्याचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन रचना कनेर व विजया अंबाडकर यांनी केले. सोहळ्याचे उद्घाटन अतिरिक्त मुख्याधिकारी, जिल्हा परिषद नागपूर कमलकिशोर फुटाणे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी गुणवंत विद्यार्थी व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रमुख मार्गदर्शक तथा वनार्टीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी महाराष्ट्र शासनाच्या महाज्योती योजनांची सविस्तर माहिती देत विद्यार्थी आणि युवकांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. महानगरपालिका नागपूरच्या शिक्षण विभागाच्या उपयुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी एमपीएससी स्पर्धा परीक्षांबाबत सखोल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग दाखविला.

माळी महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे यांनी समाजाची संघटना अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात माळी महासंघाचे अध्यक्ष अविनाश ठाकरे यांनी माळी समाजाची ऑनलाइन जनगणना सुरू करण्यात येत असल्याची घोषणा केली. समाजाची अचूक माहिती संकलित करण्यासाठी प्रत्येक समाजबांधवाने या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

नागपूर शहराध्यक्ष शंकर चौधरी यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पालक, विद्यार्थी, समाजबांधव, पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकाऱ्यांचे आभार मानले. माळी महासंघाचे राष्ट्रीय सचिव रविंद्र अंबाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित हा गुणगौरव सोहळा समाजातील गुणवंतांचा सन्मान, नव्या पिढीला प्रेरणा आणि समाजसंघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने अत्यंत यशस्वी ठरला.

यावेळी माळी महासंघाचे नानासाहेब कांडळकर, गोविंदराव वैराळे, मधुसूदन देशमुख, शामराव नागफासे, हिरालाल कावरे, ओमप्रकाश कुशवाह, राजेंद्र वाट तसेच नगरसेविका ज्योतीताई देवघरे, नगरसेवक विजय होले, नगराध्यक्ष दर्शना ढोरे, माधव चर्जन, सुरेशराव खसारे, सुरेश चीचमलकर, प्रकाश वरुडकर, इमेश्वर यावलकर आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण अध्यक्ष प्रमोद हत्ती, बाळकृष्ण येनकर तसेच प्रदीप सोनुले, राहुल पलाडे, संजय बोबडे, राधेश्याम खवले, कपिलराव उमाळे, राजू गाडगे, अजय शिंगरे, प्रदीप दहिकर, मिलिंद भोंगाडे, सचिन हिवसे, डॉ. राजेश कुराडे, सचिन सातपुते, धनराज फरकाडे, नंदूभाऊ कनेर, नंदा भोयर, रवी जोगे, गोविंदराव ठाकरे, मुंगळे, रामदास वाघे, सिंधू कांडळकर, सौरभ निमकर, आशा भोकरे, नयना गाडगे, सुनंदा नाले, संजय सावरकर, मंगला ठाकरे, रोशन बनकर, अर्चना तिजारे, अंजली अंबाडकर, मंजुषा ठाकरे, अरुणा वाघे, मनीषा पलाडे, प्रणिता लोखंडे, मालिनी भोयर, अर्चना भोंगाडे, छाया टाकरखेडे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवर, समाजबांधव, पालक, विद्यार्थी, पत्रकार बंधू, स्वयंसेवक आणि सर्व सहकाऱ्यांचे माळी महासंघातर्फे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## थोडक्यात

### 'मी सावता बोलतोय' पुस्तकाचे १० ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्ह्यातील (अरण) येथे प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समकालीन संतश्रेष्ठ सावता माळी यांच्या जीवनकार्य, कर्मयोग, विठ्ठलभक्ती आणि सामाजिक समतेचा विचार प्रभावीपणे मांडणाऱ्या 'मी सावता बोलतोय' या आगळ्यावेगळ्या पुस्तकाचे प्रकाशन दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी संत सावता माळी मंदिर, सोलापूर जिल्हयातील (अरण) येथे संपन्न होणार आहे. हे पुस्तक 'श्री माळी वैभव' मासिकाचे संपादक, ज्येष्ठ लेखक व अभ्यासक मनोहर गणपतराव चलपे यांनी लिहिले असून, संत सावता माळी यांच्या जीवनाचा प्रवास त्यांच्या आत्मकथनाच्या शैलीत उलगडण्याचा हा अभिनव प्रयत्न आहे. पुस्तकामध्ये संत सावता माळी यांचा कर्मयोग, कृषिसाधना, विठ्ठलभक्ती, सामाजिक समतेचा संदेश आणि आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी जीवनदृष्टी प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे वाचकांना जणू संत सावता माळी स्वतःच आपल्या जीवनातील प्रसंग, विचार आणि समाजप्रबोधनाचा संदेश सांगत आहेत, असा अनुभव पुस्तक वाचताना येतो. त्यामुळे हे पुस्तक संत साहित्याचा अभ्यास करणारे संशोधक, विद्यार्थी, वारकरी, भक्त तसेच सर्वसामान्य वाचकांसाठी महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन संत सावता माळी यांच्या आठव्या पिढीतील वंशजांच्या हस्ते तसेच अरण येथील परंपरागत विद्यमान पुजारी यांच्या शुभहस्ते होणार आहे. या सोहळ्यास संत साहित्य अभ्यासक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, वारकरी संप्रदायातील प्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. लेखक मनोहर चलपे हे नागपूर येथील रहिवासी असून त्यांनी साहित्य, समाजप्रबोधन आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या लेखणीतून यापूर्वी मानवी मूल्यांचे शिक्षण, म. फुल्यांच्या गोष्टी, मी सावित्री माझी कर्मकहाणी, सत्यशोधक विवाह विधी, क्रांतीसूर्य महात्मा फुले, ज्योती मानवधर्म संदेश आदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मी सावता बोलतोय हे पुस्तक संत सावता माळी यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रेरणादायी वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणारे महत्त्वपूर्ण साहित्य ठरेल, असा विश्वास लेखकांनी व्यक्त केला आहे.

### 'सुरों का कारवाँ' या सुरेल संगीत मैफलीचे आयोजन आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कलादालन आणि होप हिरोज. कॉम यांच्या संयुक्त विद्यमाने 'सुरों का कारवाँ' या सुरेल संगीत संध्येचे आयोजन बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता. सायंटिफिक सभागृह, आठ रस्ता चौक, नागपूर येथे करण्यात आलेला आहेत. या कार्यक्रमाची संकल्पना माधवी पांडे यांची असून, संगीतप्रेमींसाठी हिंदी गाण्यांची अविस्मरणीय मैफल सादर केली जाणार आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक अरविंद शिंदे, आनंद गायधनी, सवितृ पोफळी आणि अनंत पारधी हे आपल्या सुरेल गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.




कार्यक्रमाचे संगीत संयोजन आनंद मास्टे यांनी केले असून, कार्यक्रमाचे संचालन नासीर खान करतील. कार्यक्रमाचे आयोजन मनीष गायकवाड, विनिता नाडेकर आणि सुनील फुडके यांनी संयुक्तपणे केले आहे. या संगीत मैफलीत विजय वासेकर, विनोद कनकदांडे, बबिता मेहर, डॉ. स्मिता रवी रामटेके, सुनील पाटील, अनीता काशीकर, संजय येरुले, मेघा जयंत झाडे, प्रांजले, मेघा करारे, अक्षय जगताप, श्रद्धा पाठक, अनुजा क्षीरसागर, योगेश मोहिते, आनंद नारेकर, माधुरी पालीवाल यांच्यासह अनेक मान्यवर कलाकार सहभाग नोंदविणार आहेत. संगीतप्रेमी नागरिकांनी या सुरेल संध्येचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### पारशिवनीत बोलेरोमध्ये अवैध गोवंश वाहतूक, ४.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दीत नाकाबंदी दरम्यान अवैध गोवंश वाहतूक करणारी बोलेरो पिकअप पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. या प्रकरणी चालकाविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी ३ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते ४-३० वाजताच्या दरम्यान ईटगाव फाट्यापासून ५ किमी दक्षिणेकडे नाकाबंदी सुरू होती. त्यावेळी एमएच ४० बीजी ३३५२ क्रमांकाची बोलेरो पिकअप संशयास्पदरित्या जाताना दिसली. वाहनाची तपासणी केली असता त्यात विनापरवाना ४ गोवंश जनावरे आढळून आली.

आरोपी अर्जुन दामोदर भुसारी वय ४८, रा. गव्हाणा, ता. पारशिवनी हा वाहन चालवत होता. त्याने जनावरांना दोरीने बांधून आणि दारूच्या नशेत क्रूरतेने वाहतूक केल्याचे आढळून आले. वाहनात चारापाण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती.पोलिसांनी १ लाल गाय किंमत ८ हजार रुपये, २ पांढऱ्या गायी प्रत्येकी ८ हजार रुपये प्रमाणे १६ हजार रुपये , १ पांढरा बछडा किंमत ३ हजार रुपये आणि ४ लाख रुपये किमतीची बोलेरो असा एकूण ४ लाख२७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. फियादी पो.हे.कॉ. गंगाप्रसाद वरकडे यांच्या तक्रारीवरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम ११(१)(ड) प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम १८५ मोटार वाहन कायदा नुसार गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोहवा मंगेश ढबाळे करीत आहेत.

थोडक्यात

## समता सैनिक दलाची काटोल येथे पदाधिकारी व शाखाध्यक्षांची बैठक संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

समता सैनिक दल दीक्षाभूमी, नागपूर ग्रामीण (१) काटोल यांच्या वतीने पदाधिकारी, संघटक तसेच प्रत्येक गावच्या शाखाध्यक्षांची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच काटोल येथे पार पडली. बैठकीला जिल्हाध्यक्ष विद्धेश्वर गजबे (बंडूभाऊ), उपाध्यक्ष डॉ. सुनील नारनवरे, सचिव दीपक ढोके, मुख्य शाखा संघटक भागवतजी पाटील, शाखा संघटक विकास सोमकुवर, महिला प्रमुख कमांडर संध्याताई सहारे, संघटक कांताताई गजभिये, संघटक अनिताताई मेश्राम यांच्यासह तपणी, रोहना, हातला, सोनोली सावरगाव व ढवळापुर येथील शाखांचे संघटक आणि शाखाध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत समता सैनिक दलाच्या संघटनात्मक कायाचा आढावा घेण्यात आला. आगामी काळात गावागावांत संघटना अधिक बळकट करण्यासाठी सदस्य नोंदणी, शाखा विस्तार, सामाजिक जनजागृती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे साहेबरावजी मेश्राम (पशुवैद्यकीय विभाग) यांचा समता सैनिक दलाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सोनोली येथील नामदेवजी गजभिये यांचा समता सैनिक दल दीक्षाभूमी, नागपूर ग्रामीण (१) यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दोन्ही मान्यवरांचे अभिनंदन करून पुढील कायासाठी शुभेच्छा दिल्या. बैठकीचा समारोप संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करून करण्यात आला.

## नागपूरच्या इनर व्हील क्लबतर्फे आंतरराष्ट्रीय मैत्री दिन साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या इनर व्हील क्लबने अध्यक्षा पूजा साओजी यांच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय मैत्री दिन मोठ्या उत्साहात आणि



आपुलकीने साजरा केला. या प्रसंगी बोलताना अध्यक्षा पूजा साओजी म्हणाल्या की, इनर व्हीलची स्थापना मैत्री आणि समाजाची निःस्वार्थ सेवा या तत्त्वांवर झाली आहे, आणि त्यांनी प्रत्येक सदस्याला त्यांच्या उपक्रमांतून व सेवेतून ही मूल्ये जपण्याचे आवाहन केले. क्लबच्या सर्वसाधारण सभे (जीबीएम) नंतर हा सोहळा पार पडला, ज्यात ४५ सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सदस्यांनी रंगीबेरंगी मैत्री पट्ट्यांची देवाणघेवाण करून क्लबमधील मैत्री आणि एकतेची भावना अधिक दृढ केली.

मैत्री या विषयावरील काव्यवाचन स्पर्धा हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. भारती पांडेने प्रथम पारितोषिक, ज्योत्स्ना बाजारेने द्वितीय पारितोषिक आणि डॉ. वंदना बारस्करने तृतीय पारितोषिक पटकावले. प्रतिभा कुलकर्णी आणि नीता पुण्यनी यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन क्लब आयएसओच्या अंशु शुक्ला यांनी केले होते, तसेच त्यांनी उदारपणे स्पर्धेतील सर्व बक्षिसांचे प्रायोजनही केले. हा सोहळा एक संस्मरणीय आणि यशस्वी कार्यक्रम बनवण्यात त्यांच्या प्रयत्नांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## सुख शांती समाधान संस्थेतर्फे कोराडीत गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिभावात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सुख शांती समाधान संस्था, नागपूर यांच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त रविवारी (२ ऑगस्ट) ला कोराडी येथील देवी मंदिर परिसरातील अखंड दीपज्योती भवन येथे भक्तिमय वातावरणात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमास सुमारे १,३०० शिबिरार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व योगगुरू सचिनजी माथूरकर यांच्या शुभ आगमनाने झाली. श्री छत्र लेझीम पथकाच्या तालावर त्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. पुष्पवृष्टी करत त्यांना मंचापर्यंत नेण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले. उपस्थित शिबिरार्थ्यांनी सामूहिकरीत्या गायत्री मंत्राचे उच्चारण करून गुरुमाऊलींचे स्थानापन्न केले. गुरुवंदना, वर्किंग टीमचे सादरीकरण आणि विधिवत पूजन संपन्न झाले. पूजेचा मान नीलिमा राजेश मस्के या दांपत्यास लाभला. योगगुरू सचिनजी माथूरकर यांनी गायत्री मंत्र, महामृत्युंजय मंत्र जप, सात चक्रांवर ओंकार साधना तसेच बासरीच्या सुरेल धूनवर ध्यानसाधना घेतली. या साधनेमुळे संपूर्ण परिसर ओंकारमय व शांततामय वातावरणाने भारावून गेला. यावेळी सौ. मनीषा कोरडे यांनी भक्तिगीत सादर केले. अर्चना सुरुशे व तृप्तीताई यांनी गुरुतत्त्वावर विचार व्यक्त केले. संस्थेच्या वर्किंग टीममधील महिलांनी योगनृत्य सादर करून गुरूंच्या चरणी आपली भावपूर्ण श्रद्धा व्यक्त केली. तसेच नांदा ग्रुपनेही योगनृत्य व विविध कलाविष्कार सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमा दरम्यान प्रोजेक्ट डायरेक्टर अर्चना सुरुशे, नीलिमा देशपांडे व महेश जोशी यांचा योगगुरू सचिनजी माथूरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुनील पोद्दार व त्यांच्या टीमने विश्वशांतीचा संदेश देणारे शांतीगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता शाहू यांनी केले तर नीलिमा देशपांडे यांनी आभार मानले सर्व शिबिरार्थींनी आपल्या- आपल्या गटानुसार गुरूंचे दर्शन व पूजन केले. महाप्रसादानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. संस्थेच्या सचिव शीला केळापूरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली.

# 'रिकाम्या शासकीय इमारती नव्हे... सक्षम युवक घडवा !'

### जलालखेडा येथे 'युवा विकास केंद्र' उभारण्याची डॉ. अमोल रणजीत देशमुख यांची संकल्पना, ग्रामीण महाराष्ट्रासाठी विकासाचा नवा आराखडा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

ग्रामीण भागातील युवकांना दर्जेदार स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आधुनिक वाचनालय, व्यायामशाळा, रनिंग ट्रॅक आणि कौशल्य विकासाच्या सुविधा गावातच उपलब्ध करून देण्यासाठी जलालखेडा येथील जिल्हा परिषद शाळेतील रिकाम्या वर्गखोल्या व उपलब्ध शासकीय जागेचा लोकहितासाठी उपयोग करून 'युवा विकास केंद्र' उभारण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. अमोल रणजीत देशमुख यांनी केली आहे. या संकल्पनेमुळे ग्रामीण युवकांना शहरांकडे धाव घेण्याची गरज कमी होऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जलालखेडा जिल्हा परिषद शाळेच्या पाहणीनंतर डॉ. देशमुख यांनी स्पष्ट केले की, शाळा बंद करण्याचा किंवा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण करण्याचा प्रश्नच नाही. शाळेचा नियमित शैक्षणिक कारभार पूर्ववत सुरू राहणार असून, केवळ रिकाम्या वर्गखोल्या व उपलब्ध जागेचा लोकहितासाठी वापर करण्याचा प्रस्ताव आहे.

पाहणीदरम्यान काही वर्गखोल्या वापरात नसल्याचे, ग्रामपंचायतीच्या व्यायामशाळेच्या



छताला गळती लागल्याचे तसेच परिसरातील मोठी शासकीय जागा अल्पवापरित असल्याचे निदर्शनास आले. या जागेचे योग्य नियोजन केल्यास ग्रामीण युवकांसाठी आधुनिक सुविधा उभारता येतील, असे त्यांनी सांगितले.

प्रस्तावित 'युवा विकास केंद्रात' आधुनिक वाचनालय, डिजिटल अभ्यासिका, वढरउ, टढरउ, ररउ, बँकिंग, रेल्वे, पोलीस, वन विभाग व तलाठी भरतीसाठी मार्गदर्शन केंद्र, आधुनिक व्यायामशाळा, ओपन जिम, रनिंग ट्रॅक, कौशल्य विकास प्रशिक्षण, डिजिटल स्किल्स, व्यक्तिमत्त्व विकास, करिअर मार्गदर्शन आणि मुलाखत तयारी अशा सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १.१३ कोटींचा प्राथमिक आराखडा तयार करण्यात आला असून, GPDP, जिल्हा नियोजन समिती, वित्त आयोग निधी, ग्रामीण विकास विभाग, युवक व क्रीडा विभाग, सार्वजनिक ग्रंथालय योजना, आमदार-खासदार निधी तसेच उरफ निधीच्या अभिसरणातून हा प्रकल्प साकारण्याचा प्रस्ताव आहे.

डॉ. देशमुख यांनी सांगितले की, याबाबतचा सविस्तर प्रस्ताव राज्याचे मुख्यमंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर करण्यात येणार असून, जलालखेडा येथे पायलट प्रकल्प मंजूर करून त्याची राज्यभर अंमलबजावणी करण्याची मागणी केली जाणार आहे. यावेळी डॉ. अमोल रणजीत देशमुख, डॉ. झीशान शेख, प्रशांत देशमुख, योगेश (गोलू) चौरे, पप्पू महंत, नितीन राय, मेहबूब शेख, पवन कळंबे, साजिद पठाण, प्रवीण राज पुरोहित, कुणाल काटोलकर व सागर सावरकर उपस्थित होते.

"युवकांमध्ये क्षमता कमी नाही, कमतरता आहे ती संधी आणि सुविधांची. एका रिकाम्या वर्गखोलीतून उद्याचा अधिकारी घडू शकतो, तर एका दर्जेदार रनिंग ट्रॅकवरून पोलीस अधिकारी, सैनिक आणि राष्ट्रीय खेळाडू तयार होऊ शकतात. युवकांमध्ये केलेली गुंतवणूक हीच राज्याच्या भविष्याची सर्वात मोठी गुंतवणूक आहे," असे प्रतिपादन डॉ. अमोल रणजीत देशमुख यांनी केले.

जलालखेडा येथील हा प्रस्ताव ग्रामीण महाराष्ट्रासाठी विकासाचा आदर्श ठरू शकतो. शासनाने अल्पवापरित शासकीय इमारती, रिकाम्या वर्गखोल्या आणि सार्वजनिक जागांचा लोकहितासाठी वापर करून राज्यभर 'युवा विकास केंद्र' उभारण्याचे धोरण राबवावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशनतर्फे 'तुका झाला पांडुरंग' अभंग प्रस्तुतीचे आयोजन गुरुवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** आषाढी एकादशीच्या भक्तिमय वातावरणाची अनुभूती रसिकांना देण्यासाठी आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशन च्यावतीने गुरुवार, दि. ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता. नागपूर येथील सायंटिफिक सभागृहात संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या निवडक अभंगांवर आधारित 'तुका झाला पांडुरंग' या विशेष अभंग प्रस्तुतीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात संत तुकाराम महाराजांच्या निवडक अभंगांचे सुरेल सादरीकरण सुप्रसिद्ध गायिका डॉ. साधना शिलेदार आणि डॉ. राहुल एकबोटे यांच्या सुमधुर आवाजात होणार आहे. त्यांच्या सादरीकरणातून वारकरी संप्रदायाची भक्तीपर परंपरा, संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा आध्यात्मिक संदेश आणि भक्तिरसाची अनुभूती रसिकांना अनुभवता येणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशनच्या संस्थापिका डॉ. वृषाली शिलेदार यांची असून, समाजात संत साहित्याचा प्रचार- प्रसार करण्याबरोबरच अध्यात्म, संस्कार आणि भक्तीपर परंपरेचे जतन करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी निःशुल्क असून अभंगसंगीताचे रसिक, वारकरी संप्रदायाचे अभ्यासक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नागपूरकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय अभंग मैफलीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. भक्ती, संगीत आणि संत साहित्याचा सुंदर संगम घडविणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी अविस्मरणीय ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## राखी वेळेत पोहोचण्यासाठी आगाऊ बुकिंग करण्याचे टपाल विभागाचे आवाहन

### झिरो माईल्स येथील एनएसएच बुकिंग काउंटरवर २४ तास बुकिंग सुविधा उपलब्ध




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर राखी वेळेत पोहोचावी, यासाठी झिरो माईल्स येथील एनएसएच बुकिंग काउंटरवर २४ तास बुकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी पुरेशा वेळेत नोंदणी करण्याचे आवाहन टपाल विभागाने नागरिकांना केले आहे. भारतासह परदेशातील आपल्या आप्तस्वकीयांना राखी वेळेत पोहोचावी, यासाठी टपाल विभागामार्फत ग्राहकांसाठी विविध विश्वासार्ह व परवडणाऱ्या टपाल सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. देशभर भेटवस्तू, मिठाई, कपडे व अन्य वस्तू सुरक्षितपणे पाठविण्यासाठी डोमेस्टिक पार्सल सेवा, राखी व महत्त्वाची कागदपत्रे निश्चित कालावधीत पोहोचविण्यासाठी स्पीड पोस्ट, परदेशात राहणाऱ्या नातेवाईक व मित्रांना राखी व भेटवस्तू पाठविण्यासाठी आंतरराष्ट्रीय मेल व आंतरराष्ट्रीय पार्सल सेवा, तसेच पार्सल पॅकेजिंग सुविधा पोस्ट ऑफिस मध्ये उपलब्ध आहे.

नागपूर येथील झिरो माईल्स येथील एनएसएच बुकिंग काउंटरवर २४७७ बुकिंग सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच राखीच्या टपालासाठी स्वतंत्र बुकिंग काउंटर कार्यान्वित करण्यात आले असून, सणासुदीच्या काळात टपाल व पार्सल वाहतुकीत अपेक्षित वाढ लक्षात घेऊन विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. ग्राहकांनी वस्तूंचे योग्य पॅकिंग करावे, पिनकोडसह संपूर्ण व अचूक पत्ता नमूद करावा आणि शेवटच्या क्षणी होणारी गर्दी टाळण्यासाठी राखीची पाठवणी पुरेशा वेळेत बुक करावी, असे आवाहन रेल्वे मेल सर्व्हिसेस, नागपूरचे अधीक्षक गणेश बी. आंभोरे यांनी केले आहे.

पात्र टपाल सेवांसाठी ग्राहक ऑनलाइन ट्रॅकिंग सुविधेचाही लाभ घेऊ शकतात. नागरिकांना राखी, भेटवस्तू आणि सणाच्या शुभेच्छा आपल्या प्रियजनांपर्यंत सुरक्षित व वेळेत पोहोचविण्यासाठी टपाल विभागाच्या सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन रेल्वे मेल सर्व्हिसेस, नागपूरने केले आहे.

## प्रेमचंद उत्सवानिमित्त 'अलगोझा' व 'जुलूस' नाटकांचे हृदयस्पर्शी सादरीकरण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रेमचंद जयंतीनिमित्त चिटणवीस सेंटर येथे चिराग नाट्य संस्था आणि आर्टिस्ट क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अलगोझा आणि जुलूस या दोन नाटकांचे अत्यंत हृदयस्पर्शी सादरीकरण करण्यात आले. गेल्या वीस वर्षांपासून चिराग नाट्य संस्थेतर्फे राजेंद्र शुक्ला, संजय कुमार, प्रदीप पाराशर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकाराने दरवर्षी प्रेमचंद उत्सवाचे आयोजन करण्यात येत असून, यंदाही रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात प्रथम सादर करण्यात आलेल्या अलगोझा या नाटकाचे नाट्यरूपांतर रेणुका साहू यांनी केले असून, दिग्दर्शन मिलिंद धोतकर यांनी केले. त्यानंतर जुलूस या नाटकाचे नाट्यरूपांतर



चित्रा मुदगल यांनी तर दिग्दर्शन राजेंद्र शुक्ला यांनी केले. या दोन्ही नाटकांमध्ये अरविंद पांडे, प्रियंका ग्वाल, मेघा मिराचे, खालिद शेख, आकाश भारद्वाज, संकेत राऊत, मोईन कच्छी, आफताब, साक्षी गुमगावकर, डॉ. कृष्णकुमार द्विवेदी, रवि हाटेकर, नितीन ठाकरे, राजेंद्र शुक्ला आणि आशीष पवार यांनी प्रभावी अभिनय साकारला.

कार्यक्रमासाठी जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जायसवाल यांच्यासह ओमप्रकाश भागवानी, हितेश भागवानी, लतीफ सिद्दीकी आणि राधाकृष्ण नायर यांनी विशेष सहकार्य केले.

नाटकाच्या रंगभूषेची जबाबदारी नुकूल श्रीवास यांनी, वेशभूषा सुवर्णा नलोडे यांनी, ध्वनी व प्रकाश व्यवस्था किशोर वतासे आणि अनिल भालेराव यांनी, तर संगीत संयोजन मनीष चौधरी आणि हितेश चोप्रा यांनी सांभाळले. प्रस्तुती नियंत्रण व सहाय्यक म्हणून प्रदीप पाराशर, संकेत राऊत, सुरेश मून आणि गुरुदीप सिंह कपूर यांनी योगदान दिले.

यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी व दिग्दर्शक रवींद्र दुरुगकर, कल्पना शुक्ला (दीदी), लतीफ सिद्दीकी, नितीन वानसोड, विजय गुमगावकर, रोशनी सेलोकर, मोना नायर, शक्ती रतन, संजय कुमार, प्रदीप पाराशर, चिराग शुक्ला, योगेश हटवार, सय्यद मुमताज, अनिल भालेराव, प्रकाश कडू तसेच सहभागी कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी लोहिया अध्ययन केंद्र तसेच राजेंद्र शुक्ला मित्र मंडळाचे विपुल मिश्रा, राजेश गुप्ता, राजेश तिवारी, सुदेश गुप्ता, आनंद शर्मा, संतोष कटारिया, झामन गेहानी आणि रवि हाटेकर यांनी विशेष सहकार्य केले. प्रेमचंद यांच्या साहित्यिक विचारांचा आणि सामाजिक संदेशाचा प्रभावी आविष्कार या नाट्यप्रयोगांतून घडल्याने उपस्थित रसिकांनी कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली.

## भारत स्काऊट आणि गाईडचे शिक्षक प्रशिक्षण शिबिर संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

बनारसीदास रुईया हायस्कूल, काटोल येथील दृकश्राव्य कक्षात नागपूर भारत स्काऊट व गाईड जिल्हा कार्यालयातर्फे आयोजित काटोल व नरखेड तालुक्यातील शिक्षकांचे एक दिवसीय प्रशिक्षण व युनिट नोंदणी शिबिर सोमवारी संपन्न झाले.

नागपूर भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालयातर्फे आयोजित या एक दिवसीय शिबिराचे अध्यक्षस्थान बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या वंदना काळे यांनी भूषविले. भारत स्काऊट आणि गाईड नागपूरचे स्काऊट जिल्हा संघटक सत्यशील पाटील, गाईड जिल्हा संघटक हेमा वानखेडे, जिल्हा ग्रामीण रुग्णालय नागपूरच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी तनुजा फाले, ब. रु. हायस्कूलच्या पर्यवेक्षिका माधवी खिंची, ब. रु. हायस्कूलच्या स्काऊट गाईड विभाग प्रमुख सुवर्णा ठाकरे, गाईडर हर्षाली थोटे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ब. रु. हायस्कूलच्या गाईडर नीता सलाम यांनी " दया कर दान.. " ही प्रार्थना म्हटली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती, क्रान्तिज्योती सावित्रीबाई फुले, स्काऊट गाईडचे संस्थापक लॉर्ड बेडन पॉवेल, लेडी बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. या एक दिवसीय शिक्षक प्रशिक्षण शिबिरात स्काऊट जिल्हा संघटक सत्यशील पाटील आणि गाईड जिल्हा संघटक हेमा वानखेडे, ब. रु. हायस्कूलच्या स्काऊट गाईड विभाग प्रमुख सुवर्णा ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हा ग्रामीण रुग्णालय नागपूरच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी तनुजा फाले यांनी किशोरवयीन जीवन कौशल्य कार्यक्रमांतर्गत उपस्थित शिक्षकांना 'एड्स प्रतिबंध' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ब. रु. हायस्कूलचे स्काऊटर कौस्तुभ पवार यांनी केले तर गाईडर रुपाली तायडे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता गाईडर सुषमा दारोकर, निरूपमा लांडे तसेच स्काऊटर धीरज ढोले, सचिन ठाकरे, निकेश बनसोड व संदीप बांबल यांच्यासह नागपूर स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक अंकेश गोंडाणे, शिपाई अरविंद नकाशे व मारोती फटिंग तसेच ब. रु. हायस्कूलच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच स्काऊट व गाईडच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या शिबिरात काटोल व नरखेड तालुक्यातील विविध शाळेतील स्काऊट व गाईडचे शिक्षक उपस्थित होते.

### स्काऊट गाईड विभागातर्फे वृक्षारोपण

नागपूर जिल्हा भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय तसेच बनारसीदास रुईया हायस्कूलच्या स्काऊट गाईड विभागातर्फे शालेय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.



बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या वंदना काळे, भारत स्काऊट आणि गाईड नागपूरचे स्काऊट जिल्हा संघटक सत्यशील पाटील, गाईड जिल्हा संघटक हेमा वानखेडे, ब. रु. हायस्कूलच्या पर्यवेक्षिका माधवी खिंची, ब. रु. हायस्कूलच्या स्काऊट गाईड विभाग प्रमुख सुवर्णा ठाकरे, ज्येष्ठ शिक्षिका राधा चव्हाण, गाईडर हर्षाली थोटे यांच्या हस्ते वृक्षारोपण घेण्यात आले. यावेळी गाईडर सुषमा दारोकर, नीता सलाम, निरूपमा लांडे, रुपाली तायडे तसेच स्काऊटर धीरज ढोले, सचिन ठाकरे, निकेश बनसोड, कौस्तुभ पवार व संदीप बांबल यांच्यासह शाळेतील स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

थोडक्यात

## चमेडियाचा हद्दपार आदेश कायम विभागीय आयुक्तांकडून अपील नामंजूर

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

येथील हरीष चमेडिया (४१, रा. वार्ड क्र. ६) याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६(१)(अ) अन्वये उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांनी दिलेला चार महिन्यांचा हद्दपार आदेश विभागीय आयुक्त, नागपूर यांनी कायम ठेवला आहे. आरोपीने दाखल केलेले अपील नामंजूर करण्यात आले. चमेडिया याच्याविरुद्ध भिवापूर पोलीस ठाण्यात अवैध तंबाखू वाहतूक, विक्री तसेच इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या बेकायदेशीर कृत्यांमुळे सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचत असल्याने वरिष्ठ पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली भिवापूर पोलिसांनी हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी यांनी आदेश पारित केला होता. प्रकरणातील पुरावे, पोलीस अभिलेख व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद विचारात घेऊन विभागीय आयुक्तांनी हा आदेश कायदेशीर व योग्य ठरवत कायम ठेवला.

## आणीबाणीचा धर्तीवर नामांतर आंदोलनातील भीम सैनिकांना पेंशन लागू करा : बागडे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठवाडा विद्यापीठ नामंतर आंदोलन हे लोकशाहीचा हिताचे होते ते आणीबाणी पेक्षा हि खतरनाक होते वर्तमान शासनाने मिसा कायद्यानुसार जेल मधे असलेलांना पेंशन देण्याचे ठरविले मग त्याच धर्तीवर लोकशाहीचा अस्मिते साठी सोळा वर्ष संघर्ष करणाऱ्या भीम सैनिकांना शासनाने पेंशन घोषित करून त्यांच्या सन्मान करावे असे आवाहन आंरिमोचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले ते नामंतर शहिद भिम सैनिक दिनानिमित्त इंदौरा दहा नंबर पुल येथील शहिद स्मारक येथे मानवंदना कार्यक्रमात बोलत होते. प्रथम डॉ. सुधा जनबंधू यांनी दीपप्रज्वलन केले दामु दादा कावरे. प्रविण आवळे, प्रा.रमेश दुपारे, चरणदास गायकवाड, राजु कांबळे, जयदेव चिंवडे , वैशाली तभाने, नरेश खनः रमेश दुपारे, विद्यानंद गांवडे, व मोठ्या संख्येने महिला पुरूष कार्यकर्ते उपस्थित होते.

## नामांतरातील शहीदांच्या कुटुंबीयांच्या त्यागाचे स्मरण करणे हीच खरी आदरांजली : विलास गजघाटे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर व्हावे, यासाठी सन १९७८ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात ऐतिहासिक आंदोलन उभारण्यात आले. या आंदोलनात अनेक युवकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले व ते शहीद झाले. मात्र, अनेक वर्षे उलटूनही त्यांच्या कुटुंबीयांची अपेक्षित दखल घेणारा नेता पुढे आला नाही, ही खंत दीक्षाभूमी स्मारक समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष विलास गजघाटे यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी नागपूर येथील १० नंबर पूल परिसरातील नामांतर शहीद स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच नामांतर आंदोलनातील शहीदांच्या कुटुंबीयांच्या त्यागाचे स्मरण ठेवून त्यांना सन्मान व न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. याप्रसंगी शरद मेश्राम, सुनील भोसले, मिलिंद थुल, देवाजी रंगारी, अशोक शेंद्रे, विठ्ठलराव ढोगळे यांच्यासह अनेक आंबेडकरी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अन्नपूर्णा मोहीम ठरली गरीब कुटुंबाचा आधार : संत रामपालजी महाराज

**दै. सिंहवाणी वृत्त, खडकवाडी**

जगतगुरू तत्त्वदर्शी संत रामपालजी महाराज यांच्या प्रेरणेतून राबविण्यात येणाऱ्या अन्नपूर्णा मोहिमेअंतर्गत महाराष्ट्रातील



अहिल्यानगर मधील पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथील श्री. बाळू बर्डे यांच्या गरजू कुटुंबाला आधुनिक आरसीसी घर, एक महिन्याचे रेशन, मुलांसाठी शैक्षणिक साहित्य, वैद्यकीय मदत तसेच आवश्यक घरगुती उपयोगाच्या वस्तूंचे निःशुल्क वितरण करण्यात आले. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून सुरक्षित निवासस्थान नसल्याची माहिती संत रामपालजी महाराज यांच्यापर्यंत पोहोचताच सतलोक आश्रम ढवळपुरी येथील समिती व सेवादारांनी श्रमदानातून अल्पावधीत आधुनिक सुविधांनी सुसज्ज असे आरसीसी घर उभारले. तसेच कुटुंबाला सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी आवश्यक रेशन, शैक्षणिक साहित्य आणि आरोग्यविषयक मदतही देण्यात आली. या कार्यक्रमाला अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके हे संसदीय अधिवेशनामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या सूचनेनुसार त्यांचे प्रतिनिधी व बंधू श्री. दीपक लंके यांनी आवास वितरण कार्यक्रमास उपस्थित राहून बाळू बर्डे यांच्या कुटुंबाला नव्या घराची चावी, रेशन किट, शैक्षणिक साहित्य तसेच वैद्यकीय मदतीचे वितरण केले. यावेळी त्यांनी या सेवाकार्याचे कौतुक करत अशा मानवतावादी उपक्रमांमुळे समाजाला प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच संत रामपालजी महाराज यांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित नागरिकांनी अन्नपूर्णा मोहिमेचे मुक्तकंठाने कौतुक करत, जात, धर्म किंवा पंथाचा कोणताही भेदभाव न करता गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणे हीच खरी मानवसेवा असल्याची भावना व्यक्त केली. मुनींद्र धर्मार्थ ट्रस्ट यांच्या माध्यमातून देशभरात निःशुल्क घरे, रेशन, शिक्षण व वैद्यकीय सहाय्य उपलब्ध करून समाजसेवेचा अनुकरणीय आदर्श निर्माण केला जात असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

### पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
>
> **- रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख**
> **मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष**

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत. वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# मिहान कर्मचाऱ्यांची स्मार्ट व शाश्वत प्रवासासाठी शहर बस व मेट्रोला पसंती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरमधील उदयोन्मुख आयटी व व्यावसायिक केंद्र म्हणून मिहान वेगाने विकसित होत असताना, या परिसरात ये-जा करणाऱ्या व्यावसायिकांसाठी विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक ही अत्यावश्यक गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर आयटी पार्क, नागपूर येथे मुख्यालय असलेल्या अग्रगण्य एडटेक कंपनी केसी ओव्हरसीज एज्युकेशनने आपल्या काही कार्यालयीन कामकाजाचे स्थलांतर ४ ऑगस्ट २०२६ पासून मिहान एसईझेड येथील नव्या कॅम्पसमध्ये करण्याचा निर्णय घेतला असून, कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी नागपूर मेट्रो आणि तिच्या एकात्मिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेअंतर्गत शहर बसेसला उत्स्फूर्त प्रतिसाद देत दैनंदिन प्रवासासाठी स्वीकारले आहे.




शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि पर्यावरणपूरक नागरी बस वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केसी ओव्हरसीज एज्युकेशन, महा मेट्रो आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मचाऱ्यांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. मिहानमधील झपाट्याने वाढणाऱ्या आयटी परिसंस्थेला सक्षम करण्यासाठी विश्वासार्ह मल्टीमोडल (बहुविध) सार्वजनिक वाहतूक व्यवस्था किती महत्त्वाची आहे, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. या माध्यमातून कर्मचाऱ्यांना सुरक्षित, वेळेवर, तणावरहित आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

या उपक्रमाअंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी 'मेट्रो व फिडर बस संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी नागपूर फीडर बसद्वारे उपलब्ध असलेल्या अखंड 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी'ची सविस्तर माहिती दिली. प्रस्तावित प्रवास आराखड्यानुसार कर्मचारी मेट्रोने खापरी मेट्रो स्थानकापर्यंत प्रवास करतील आणि तेथून नागपूर महानगरपालिकेद्वारे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विशेष फीडर बसच्या माध्यमातून मिहान कॅम्पसमध्ये पोहोचतील.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या महा कार्ड नोंदणी शिबिराला कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १५० हून अधिक कर्मचाऱ्यांनी संपर्करहित महा कार्ड खरेदी करून ते सक्रिय केले. महा कार्डच्या माध्यमातून मेट्रोमध्ये जलद, सुलभ आणि कॅशलेस डिजिटल तिकीट प्रणालीचा लाभ मिळत असून, दैनंदिन प्रवास अधिक वेगवान, सोयीस्कर आणि त्रासमुक्त होत आहे. याशिवाय मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी अधिक बळकट करण्यासाठी नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाने 'चलो'च्या सहकार्याने विशेष बस पास नोंदणी शिबिराचेही आयोजन केले. त्यामुळे कर्मचाऱ्यांना मेट्रोबरोबरच शहर बस सेवेचाही सहज वापर करता येणार आहे.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे अनेक कर्मचाऱ्यांनी केवळ कंपनीचे कार्यालय स्थलांतरित होत असल्यामुळेच नव्हे, तर आधीपासून मेट्रोचा वापर करणाऱ्या सहकाऱ्यांच्या सकारात्मक अनुभवांमुळे सार्वजनिक वाहतुकीची निवड केली. मेट्रो व फीडर बस सेवांची विश्वासार्हता, वेळेचे काटेकोर पालन आणि आरामदायी प्रवासामुळे अनेक कर्मचाऱ्यांनी खासगी वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय आत्मविश्वासाने स्वीकारला आहे. नागपूरमधील नोकरदार वर्गामध्ये सार्वजनिक वाहतुकीबाबत वाढत असलेल्या विश्वासाचे हे सकारात्मक चित्र आहे.

मिहानमध्ये अधिकाधिक आयटी कंपन्या आपले व्यवसाय विस्तारत असताना, कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन प्रवासासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक ठरत आहे. मेट्रो नेटवर्क आणि प्रभावी लास्ट माईल कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून कर्मचारी आपल्या कार्यस्थळी वेळेवर, सुरक्षित, किफायतशीर आणि आरामदायी पद्धतीने पोहोचू शकतात. यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होऊन पर्यावरण संरक्षणालाही हातभार लागत आहे.

केसी ओव्हरसीज एज्युकेशनच्या कर्मचाऱ्यांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा नागपूरकरांचा सार्वजनिक वाहतुकीवरील वाढता विश्वास अधोरेखित करणारा आहे. विस्तारत असलेली शहर बस वाहतूक व मेट्रो नेटवर्क, एकात्मिक फीडर सेवा आणि डिजिटल तिकीट प्रणाली यांच्या बळावर सार्वजनिक वाहतूक आता केवळ पयार्यी व्यवस्था राहिलेली नसून, विशेषतः मिहानच्या वाढत्या आयटी कॉरिडॉरमध्ये कार्यरत व्यावसायिकांसाठी विश्वासार्ह, किफायतशीर आणि शाश्वत नागरी प्रवासाचा सर्वाधिक पसंतीचा पर्याय बनत आहे.

## खा. राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसानिमित्त सालेकसात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सचिव, राज्यसभा खासदार तथा गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सालेकसा येथे विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तालुका सालेकसा यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०.०० वाजता ग्रामीण रुग्णालय, सालेकसा येथे रुग्णांना फळवाटप व वृक्षारोपणाने होणार आहे. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर, स्टेशन रोड, सालेकसा येथे खासदार राजेंद्रजी जैन यांच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी अभिषेक पूजन करण्यात येणार आहे. याच ठिकाणी सकाळी ११.३० वाजता महिलांना १०१ किलो साखर वाटप करण्यात येणार असून, हा उपक्रम विशेष आकर्षणाचा ठरणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तालुका सालेकसा यांच्या वतीने करण्यात आले असून, तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे व शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी तयारी पूर्ण केली आहे. कार्यक्रमास पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



## सुनेत्रा पवार यांच्यावरील वक्तव्याचा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसकडून तीव्र निषेध, ५ ऑगस्टला नागपुरात 'जोडे मारो' आंदोलन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्याच्या लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केल्याचा आरोप असलेल्या विधानाचा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता नागपूर येथील व्हेरायटी चौकात 'जोडे मारो' आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या विदर्भ अध्यक्षा प्रा. माधुरी पालीवाल यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. संबंधित वक्तव्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, लोकशाही मार्गाने निषेध नोंदविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. माधुरी पालीवाल म्हणाल्या की, कोणत्याही व्यक्तीबाबत अपमानास्पद किंवा अवमानकारक भाषा वापरणे ही महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेला शोभणारी बाब नाही. अशा विधानांचा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसकडून ठाम निषेध करण्यात येत असून, याविरोधात संघटनेचे पदाधिकारी आणि विद्यार्थी एकत्रितपणे आंदोलन करतील.

# प्रवासी महिलेचे दागिने चोरणाऱ्या चार महिलांना रामनगर पोलीसांनी केले जेरबंद

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

चंद्रपूर शहरातील बसस्थानक परिसरात नागपूरला जाण्यासाठी बसची वाट पाहत असलेल्या एका प्रवासी महिलेच्या पर्समधील सुमारे २ लाख १७ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरल्याप्रकरणी रामनगर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत अवघ्या काही तासांत चार आरोपी महिलांना ताब्यात घेतले.



संशयितांकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. प्राप्त माहितीनुसार, १ ऑगस्ट २०२६ रोजी फिर्यादी सुधा नारायण तुरकेले ५३ वर्षे, रा. नगीनाबाग, चंद्रपूर या चंद्रपूर बसस्थानकातील नागपूर प्लॅटफॉर्मवर बसची प्रतीक्षा करत होत्या. बसमध्ये चढण्याच्या गदीर्चा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पर्समधून ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुमके किंमत अंदाजे ७२ हजार रुपये तसेच १० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र व पदक किंमत अंदाजे १ लाख ४५ हजार रुपये असा एकूण २ लाख १७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९७०/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ३(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण विभागाचे प्रमुख सपोनि. शिवाजी नागवे यांच्या नेतृत्वात विशेष पथके तयार करण्यात आली. एक पथक बसस्थानक परिसरात, तर दुसरे पथक पडोली चौक परिसरात रवाना करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयित महिलांचा शोध घेत असताना पडोली चौकात संशयास्पद हालचाली करणाऱ्या आरोपी रूपा विशाल नाडे २५ वर्षे व मैना महेंद्र मानकर ३५ वर्षे, दोघीही रा. रामेश्वरी टोली, नागपूर यांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत चोरीतील मुद्देमाल त्यांच्या दोन साथीदार महिलांकडे असून त्या ट्रॅव्हल्सने नागपूरकडे रवाना झाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोउपनि कृष्णा दराडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने वरोरा येथील आनंदवन चौकात ट्रॅव्हल्स थांबवून तपासणी केली.

त्यावेळी आरोपी अनिता पिंटू हातागडे ३५ वर्षे व ज्योती विजय हातागडे ३२ वर्षे, दोघीही रा. रामेश्वरी टोली, नागपूर यांना ताब्यात घेण्यात आले. महिला आरोपी ज्योती विजय हातागडे हिच्या झडतीदरम्यान फिर्यादीचे चोरीस गेलेले सोन्याचे झुमके व मंगळसूत्रासह संपूर्ण २ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर चारही महिलांना रामनगर पोलीस ठाण्यात आणून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या नेतृत्वात गुन्हे अन्वेषण पथकातील सपोनि शिवाजी नागवे, सपोनि हनुमान उगले, पोउपनि कृष्णा दराडे, पोहवा प्रकाश बलकी, बाबा नैताम, मपोहवा मनीषा मोरे, पोहवा रामप्रसाद नैताम, आंनद खरात, रवीकुमार ढेंगळे, जितेंद्र आकरे, पोअं प्रकाश मडावी, संदिप गेडाम, पंकज ठोंबरे, सुरेश कोरवार, पंकज पोंदे, सुरज शेडमाके तसेच मपोअं ब्ल्युटी साखरे यांनी केले.

थोडक्यात

## गोंदिया जिल्ह्यातील शासकीय धान खरेदीवर प्रश्नचिन्ह, धानाची वाहतूक छत्तीसगडकडे, चौकशीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

गोंदिया जिल्ह्यातील शासकीय धान खरेदी केंद्रांमधून संकलित करण्यात आलेल्या धानाची वाहतूक महाराष्ट्रातील स्थानिक राईस



मिलकडे न होता मोठ्या प्रमाणावर सालेकसा मार्गे डोंगरगड व रायपूर (छत्तीसगड) येथे होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. या प्रकारामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत असून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या धान खरेदी व्यवस्थेतील धानाला प्राधान्याने राज्यातील नोंदणीकृत मिलमध्ये प्रक्रिया होणे अपेक्षित असताना मोठ्या प्रमाणात धान राज्याबाहेर जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. या वाहतुकीमागे नेमके कोणते नियम लागू आहेत, संबंधित परवानग्या आहेत का, तसेच या प्रक्रियेमुळे राज्यातील मिलधारक व शेतकऱ्यांच्या हितावर परिणाम होत आहे का, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नागरिकांचे म्हणणे आहे की, शासनाने या संपूर्ण व्यवहाराची पारदर्शक चौकशी करून धान राज्याबाहेर कोणाच्या परवानगीने व कोणत्या प्रक्रियेनुसार पाठविले जात आहे, याची माहिती सार्वजनिक करावी. तसेच या प्रकरणात कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. सालेकसा मार्गे डोंगरगड व रायपूरकडे धानाची वाहतूक सुरू असल्याचा दावा होत असताना प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## आपत्कालीन व आकस्मिक कामांना प्राधान्य द्या!

### दुर्बल घटक समितीच्या सभापती लक्ष्मी हत्तीठेले यांचे निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

झोपडपट्टी व गलिच्छ वस्तीमध्ये दुर्बल घटक समितीच्या निधीअंतर्गत करावयाच्या कामे करताना आकस्मिक व आपात्कालिन कामांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश मनपाच्या दुर्बल घटक समितीच्या सभापती कु. लक्ष्मी हत्तीठेले यांनी दिले. दुर्बल घटक समितीची बैठक सभापती कु. लक्ष्मी हत्तीठेले यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. ४) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात पार पडली. यावेळी स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, समितीचे सदस्य योगेश पाचपोर, सरस्वती सलामे, मनीष बनसोड, विवेक निकोसे, वर्षा डोंगरे, किरण मनपिया, तुषार लारोकर, कु. दुर्गेश्वरी कोसेकर उपस्थित होते. या बैठकीत अध्यक्षांनी दुर्बल घटक समितीच्या अंतर्गत विविध भागांद्वारे शहरात सुरू असलेल्या विकास कामांचा आढावा घेतला. आधी मंजूर झालेले कामे व नवीन कामांच्या प्रस्तावांबद्दल यावेळी माहिती देण्यात आली.

**आधी सुचविलेले कामे पूर्ण करा: नरेंद्र (बाल्या) बोरकर**

यावेळी बोलताना सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी नगरसेवकांनी या आधीच सुचविलेले व आमदारांनी सुचविलेल्या कामांची माहिती दुर्बल घटक समितीच्या सभापतींना द्यावी. यावर सभापती निर्णय घेतील. कोणत्याही कामांना सभापतींच्या मान्यतेशिवाय परस्पर मंजुरी देऊ नये, असेही निर्देश बोरकर यांनी दिले. दुर्बल घटक समितीच्या अंतर्गत नगरसेवकांच्या आकस्मिक व आपात्कालिन कामांना मंजुरी देण्यात येईल. पावसाळा सुरू असल्याने या संदर्भात असलेली कामे मंजूर करण्यात येईल, असेही कु. लक्ष्मी हत्तीठेले यांनी सांगितले.

## आयुक्तांनी केली रामनगर मैदानाची पहाणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन यांनी मंगळवारी(ता.८) रामनगर मैदानाची पाहणी केली. यावेळी मनपाच्या क्रीडा विशेष समिती समिती दर्शनी धवड, मनपाचे उपायुक्त मंगेश खवले, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर यांच्यासह इतर अधिकारी उपद्रव शोध पथकाचे जवान उपस्थित होते. नागपूर महानगरपालिकेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शहरातील ७५ मैदाने विकसित करण्यात येणार आहे. मनपाद्वारे सहाही मतदान संघात अत्याधुनिक यंत्र सामुग्रीने युक्त अशा क्रीडांगणाचा विकास केला जाणार असून, शहरातील क्रीडापटू यांना याचा लाभ होणार आहे. याच संदर्भात मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी रामनगर मैदानात करण्यात येणाऱ्या विकासाबद्दल माहिती जाणून घेतली. उपायुक्त मंगेश खवले यांनी मैदान विकसित करण्यासंदर्भात माहिती दिली.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत केळवद येथे नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील बळीराजाला आणि ग्रामीण भागाला कृषी क्षेत्रासाठी अधिक मजबूत, अखंडित आणि गुणवत्तापूर्ण वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या व महावितरणच्या कटिबद्धतेला आणखी एक मोठे यश मिळाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' आणि आरडीएसएस योजनेंतर्गत महावितरणच्या सावनेर विभागांतर्गत येणाऱ्या ३३ केव्ही केळवद उपकेंद्रात सोमवारी (दि. ३ ऑगस्ट) नवीन अतिरिक्त ५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मर



यशस्वीरीत्या आणि विनाविघ्न कार्यान्वित करण्यात आला आहे. केळवद उपकेंद्रातील या नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या लोकार्पण व कार्यान्विती सोहळ्यास नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक पायाभूत सुविधा विभागाच्या अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार, प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे आणि सावनेर विभागाचे कार्यकारी अभियंता सुधीर हेडाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत व नागपूर ग्रामिण मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांच्या मार्गदर्शनात ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.

केळवद उपकेंद्रात नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित झाल्यामुळे परिसरातील वीज भार व्यवस्थापन आता पूर्वीपेक्षा अधिक प्रभावी व अचूक होणार आहे. विशेषतः शेतीपंपांना सुरळीत, स्थिर आणि हवी तेवढी वीज मिळण्याचा मार्ग आता पूर्णपणे सुकर झाला आहे. वीज दाब कमी होणे किंवा वीज पुरवठा खंडित होण्याच्या समस्या आता इतिहासजमा होणार असून, केळवद परिसरातील वीज वितरणातील ताण कमी होण्यास मदत मिळणार असल्याने शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य वीज ग्राहकांना प्रचंड मोठा दिलासा मिळणार आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचे संपूर्ण काम 'मे. पॉलिकॅब इंडिया लिमिटेड' या एजन्सीमार्फत उच्च गुणवत्तेसह आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात आले आहे. एजन्सीच्या प्रतिनिधींनी व तांत्रिक पथकाने दाखवलेली तप्परता आणि अचूकता यामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला आहे.

या नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या यशस्वी पूर्ततेमुळे केळवद परिसरातील वीज पायाभूत सुविधा आता अत्यंत भक्कम झाली असून, भविष्यातील वाढती औद्योगिक व कृषी ग्राहकांच्या विजेची मागणी महावितरण पूर्णपणे सज्ज असल्याचे याप्रसंगी स्पष्ट करण्यात आले. या विकासकामामुळे परिसराच्या सर्वांगीण प्रगतीला एक नवी व सकारात्मक दिशा मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## कार्यकारी प्राचार्यपदी डॉ. दीपा पान्हेकर यांच्या नियुक्तीस मान्यता

### विद्यापीठाकडून अधिकृत मान्यता आदेश जारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्यपदी डॉ. दीपा पान्हेकर यांच्या नियुक्तीस राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने अधिकृत मान्यता दिली आहे. विद्यापीठाने १ ऑगस्ट २०२६ रोजी ही मान्यता प्रदान केली असून, अधिकृत आदेश प्राप्त झाल्याने महाविद्यालय प्रशासनाचा कारभार सुरळीत चालण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरून प्रशासकीय कोंडी निर्माण झाली होती. महाविद्यालय प्रशासनाने डॉ. पान्हेकर यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव नागपूर विद्यापीठाकडे सादर केला होता, मात्र काही आक्षेपांमुळे या प्रक्रियेला विलंब झाला होता. त्यानंतर महाविद्यालय प्रशासनाने सर्व आवश्यक प्रक्रियेची पूर्तता करून वस्तुस्थिती मांडल्यानंतर विद्यापीठाने डॉ. पान्हेकर यांच्या नियुक्तीवर मान्यतेची मोहोर उमटवली.

डॉ. पान्हेकर या गेल्या एक ते दीड वर्षापासून महाविद्यालयाचे कामकाज पाहत असून, त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय नेतृत्वाबद्दल विद्यार्थी आणि शिक्षकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

प्रशासकीय अनिश्चिततेमुळे महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे वेतन रोखले गेले होते, ज्यामुळे कर्मचाऱ्यांवर मोठा मानसिक ताण निर्माण झाला होता. विद्यापीठाच्या या मान्यता आदेशामुळे आता महाविद्यालयाच्या कामकाजाला स्थैर्य मिळेल, आर्थिक अडचणी दूर होतील आणि प्रशासकीय कामकाज सुरळीत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**उच्च न्यायालयात खबरदारीचा अर्ज**

या मान्यतेला झालेला विलंब लक्षात घेता, भविष्यात पुन्हा कोणतेही प्रशासकीय किंवा कायदेशीर अडथळे निर्माण होऊ नयेत आणि महाविद्यालयाचे कामकाज सुरळीत राहावे, यासाठी स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी उच्च न्यायालय आणि विद्यापीठ व महाविद्यालय न्यायधिकरणात खबरदारीचा अर्ज दाखल केला आहे.

**विद्यापीठाच्या या निर्णयाचे स्वागत**

विद्यापीठाच्या या निर्णयाचे स्वागत करत, डॉ. पान्हेकर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली डॉ. आंबेडकर कॉलेजची शैक्षणिक आणि प्रशासकीय वाटचाल अधिक वेगाने व सक्षमपणे पुढे जाईल, असा विश्वास स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्यासह महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## कोळसा खाणीसाठी अधीग्रहण शेतजमिनीला ३० लाख रुपये प्रती एकर मोबदला द्या!

### आमदार करण देवतळे यांची केंद्रीय कोळसा व खान मंत्री किशन रेड्डी यांच्याकडे मागणी, माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांच्या नेतृत्वामध्ये घेतली भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**

वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रातील स्थानिक लोकांच्या व बेरोजगारांच्या समस्या व शेतजमिनीला ३० लाख रुपये प्रती एकर भाव मिळावा यासाठी दिल्ली येथे माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री भारत सरकार हंसराज अहिर यांच्या नेतृत्वामध्ये आमदार करण देवतळे यांनी केंद्रीय कोळसा व खान मंत्री जी किशन रेड्डी यांना दिल्ली येथे भेटून निवेदन दिले. कोल इंडिया col india आणि वेस्टर्न कोल फिल्डस लिमिटेड WCL च्या प्रकल्पग्रस्त आणि स्थानिक बेरोजगारांच्या प्रलंबित मागण्या माननीय केंद्रीय मंत्री



यांच्याकडे मांडण्यात आल्या जमीन संपादनाचा योग्य मोबदला आणि नोकरी मिळण्याबाबतच्या विविध समस्यावर यावेळी सफल चर्चा करण्यात आली तसेच जमीन संपादनाचा मोबदला नोकरीसह प्रति एकरी ३० लाख रुपये करण्यात यावा ही प्रलंबित मागणी लावून धरत त्यासंबंधीच्या इतर महत्त्वाच्या सूचना केंद्रीय मंत्र्याकडे करण्यात आल्या यासोबतच केपीसीएल आणि अरबिंदो या खाजगी कंपन्याकडून स्थानिक लोकांची होणारी पिळवणूक, रखडलेल्या नोकऱ्या, प्रलंबित मोबदला, पुनर्वसन आणि वेतनाचे प्रश्न या तक्रारीवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. कर्नाटक पावर कार्पोरेशन लिमिटेड केपिसीएल आणि अरबिंदो कंपनीकडून होत असलेले अवैध खणन कराराचे उल्लंघन आणि अधिक उत्पादनातून होणारी अफरातफर यासारख्या गंभीर प्रकाराची कोल कंट्रोलरमार्फत चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या सर्व समस्या व तात्काळ तोडगा काढण्यासाठी नागपूर येथे डब्ल्यूसीएलची विशेष बैठक आयोजित करावी अशी मागणी हंसराज अहिर व आमदार करण देवतळे यांनी केंद्रीय मंत्री जी किशन रेड्डी यांना करण्यात आली.

## स्वातंत्र्यलढ्याचे झुंजार सेनानी क्रांतीसिंह नाना पाटील यांना महावितरणतर्फे अभिवादन!




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र लढा पुकारत 'प्रतिसरकार'ची स्थापना करणारे, लोकशाही विचारांचे प्रणेते आणि शेतकरी, कामगार व शोषित घटकांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे स्वातंत्र्यलढ्याचे अमर सेनानी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले. नागपूर येथील काटोल मार्गावरील विद्युत भवन या महावितरणच्या प्रशासकीय कार्यालयात हा अभिवादन सोहळा पार पडला. प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यकारी अभियंता अमित शिवलकर, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह प्रादेशिक व परिमंडल कार्यालयातील विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

## अवयवदान जनजागृती अभियान पंधरवड्याला नागपुरात सुरुवात

### पाचपावली सुतीका गृह येथे मनपातर्फे अभियानाचा शुभारंभ, ३ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'अवयवदान पंधरवडा'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शासनाच्या वतीने ३ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत अवयवदान पंधरवडा राबविण्यात येत आहे. या अभियानाला नागपूर शहरात व्यापक स्वरूप देण्यात आले असून, शहरातील प्रत्येक रुग्णालयात अवयवदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे पाचपावली सुतीका गृह येथे अवयवदान जनजागृती अभियानाची सुरुवात करण्यात आली.



कार्यक्रमात मनपाच्या वैद्यकीय आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे, आशीनगर झोनचे सभापती शेख, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार ,स्त्रीरोग तज्ज्ञ व पाचपावली सुतीकागृहचे प्रमुख डॉ. कांचन किम्मतकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.माने, डॉ. वैशाली मोहकर, पी. एच. एन. दिपाली गणोरकर, आशा वर्कर व संबधीत कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

नागपूर महानगरपालिकेच्या मा. महापौर निता ठाकरे यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, वैद्यकीय आरोग्य सभापती मनिषा अतकरे, आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सरला लाड आणि साथरोग अधिकारी डॉ. गोवर्धन नवखरे यांच्या देखरेखीखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मनपाच्या वैद्यकीय आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे यांनी अवयवदानाचे महत्त्व विषद केले. अवयवदान हे मानवतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आणि निःस्वार्थ कार्य असून, एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे नागरिकांनी अवयवदानाबाबत सकारात्मक भूमिका घेऊन या जनहितकारी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.नरेंद्र बहिरवार यांनी अवयवदानाबाबत मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, आपल्या देशात दरवर्षी हजारो रुग्ण हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस तसेच इतर महत्त्वपूर्ण अवयवांच्या प्रत्यारोपणाची प्रतीक्षा करतात. मात्र, वेळेवर अवयव उपलब्ध न झाल्यामुळे अनेक रुग्णांना आपला जीव गमवावा लागतो. अशा प्रत्येक रुग्णासाठी एक अवयवदाता ही नवी आशा, नवे जीवन आणि नवे भविष्य घेऊन येतो. अवयवदान ही मानवतेच्या महान आणि निःस्वार्थ सेवांपैकी एक आहे. मृत्यूनंतरही आपल्या अवयवांच्या दानातून अनेकांना नवजीवन मिळू शकते. एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात आणि अनेक कुटुंबांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलू शकतो, असे डॉ. बहिरवार यांनी सांगितले.

अवयवदानाबाबत समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी मनपाच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आणि संबंधित यंत्रणांकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र, या अभियानाची खरी सफलता नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच साध्य होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेऊन अवयवदानाचा संकल्प करावा तसेच आपल्या कुटुंबीय, मित्र आणि परिचितांनाही यासाठी प्रेरित करावे असे आवाहन डॉ. नरेंद्र बहिरवार यांनी केले.

मृत्यू हा जीवनाचा शेवट असला, तरी आपल्या अवयवदानामुळे एखाद्या व्यक्तीसाठी नव्या जीवनाची सुरुवात होऊ शकते. चला, अवयवदानाचा संकल्प करूया, जीवन वाचवूया आणि मानवतेच्या या महान सेवेत सहभागी होऊया, असे आवाहन मनपाचे स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कांचन किम्मतकर यांनी केले. दरम्यान, ३ ते १५ ऑगस्टदरम्यान नागपूर शहरातील विविध रुग्णालयांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती, मार्गदर्शन आणि नागरिकांना अवयवदानाचा संकल्प करण्यासाठी प्रोत्साहन देणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

